रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २१८
www.ramprahar.com

◆ मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## राज्यात अवकाळी पावसाची जोरदार हजेरी



**नागपूर :** गेल्या काही दिवसांपासून उकाड्याचा त्रास वाढला असतानाच रविवारी मध्यरात्रीनंतर अचानक वादळी पावसाने जोरदार हजेरी लावली. विदर्भात विशेषत: नागपूर, गोंदिया व भंडारा जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाची नोंद झाली आणि वादळाचा तडाखाही बसला. याशिवाय मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील काही भागांतही अवकाळी पावसाच्या सरी बरसल्या. दरम्यान, हवामान विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिवसह विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता असून येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रातील सोलापूर व निफाड परिसरातही ढगाळ वातावरण असून हलक्या पावसाची शक्यता आहे.


अंतरंग

कळंबोलीत पाणीटंचाई; सिडकोवर धडक मोर्चा/३

रायगडात २४० ग्रामपंचायतींवर आता सरपंचच प्रशासक/५

कोल्हापूरचा अजिंक्य रेडकर 'नवी मुंबई महापौर श्री'/८


# अजितदादांच्या आठवणींनी गहिवर

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात दोन्ही सभागृहांमध्ये शोकप्रस्ताव

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर विधीमंडळाचे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार (दि.२३) पासून सुरू झाले. अजितदादांच्या निधनाबद्दल दोन्ही सभागृहात शोकप्रस्ताव मांडण्यात आला. त्यामुळे अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधान भवनाचे वातावरण भावूक झाल्याचे दिसून आले.



आपल्या भावना व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाकवी भास यांच्या 'स्वप्नवासवदत्तम्' या नाटकात एक सुभाषित आहे. 'लाकूड जळते तेव्हा अग्नी केवळ शरीर जाळतो, परंतु मित्रशोक हा हृदय आणि अंतरात्म्यालाही जाळून खातो', असे त्यात म्हटले आहे. अजित पवार यांच्या निधनाने हीच वेळ आज माझ्यावर आली आहे. त्यांच्यासारखा एक सच्चा मित्र आणि राजकीय सहप्रवाशाचे जाणे ही केवळ राजकीय हानी नाही, तर ती आपल्या सर्वांच्या अंतःकरणाला वेदना देणारी घटना आहे. असे म्हणतात, काळ हे सर्व दुःखांवरचे औषध आहे, मात्र या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी आणि मनातील वेदना कधीही कमी होणाऱ्या नाहीत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, अजितदादा म्हणजे स्पष्टवक्तेपणा, वक्तशीरपणा पाळणारा नेता होता. दादा तुमचा आमच्यातून निघून जाण्याचा निर्णय चुकलेला आहे, माघारी या. आज सभागृहात पाहताना ते डोळ्यासमोर दिसत आहेत. सुनेत्रा पवारांनी जबाबदारी स्वीकारली. कार्यकर्त्यांना आणि सहकाऱ्यांना त्या धीर देत आहेत. आम्ही त्यांच्या पाठीशी उभे आहोत. विकास आता लांबणार नाही, विकास आता थांबणार नाही ही घोषणा आम्ही पुढे घेऊन जात राहू.

यावेळी मंत्री छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, आदिती तटकरे, दिलीप वळसे-पाटील यांच्यासह अनेकांचा कंठ दाटून आला. याशिवाय इतर सर्वपक्षीय नेत्यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



## रायगड जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा उत्साहात

# पुरुषांमध्ये ओमकार वेश्वी, महिलांमध्ये कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी संघ विजेता

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा गौरव



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर मैदानावर प्रौढ महिला व पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा रंगली. या स्पर्धेमध्ये पुरुषांच्या गटात ओमकार वेश्वी, तर महिलांच्या गटात कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी संघाने विजेतेपद पटकाविले.

२० ते २२ फेब्रुवारी अशा तीन दिवस खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील १२८ पुरुष, तर ३२ महिला संघांनी सहभाग घेतला होता. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा संयोजन समितीचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी जनरल सेक्रेटरी अ‍ॅड. आस्वाद पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजकांनी केलेले उत्कृष्ट नियोजन, पंचांची काटेकोर व निष्पक्ष कामगिरी तसेच प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे स्पर्धेला भव्य यश लाभले. संपूर्ण स्पर्धा शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

स्पर्धेतील अंतिम सामन्यात पुरुषांच्या गटात ओमकार वेश्वी संघाने शिवाई बांधण संघाला पराभूत करून अजिंक्यपद पटकावले, त्यामुळे शिवाई बांधण संघ उपविजेता ठरला. तृतीय क्रमांक जय बजरंग रोहा, तर चतुर्थ क्रमांक जयभवानी वाशी पेण संघाने मिळवला. महिलांच्या गटात कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी विजेता संघाने विजेतेपद प्राप्त केले. उपविजेता पनवेल स्पोर्ट्स क्लब संघ, तर तृतीय व चतुर्थ क्रमांक अनुक्रमे ओमकार वेश्वी व दत्तात्रेय क्रीडा पनवेल संघाने मिळविला.

या स्पर्धेच्या निमित्ताने कबड्डी असोसिएशन व पदाधिकाऱ्यांच्या वतीने अमृत महोत्सवानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा गौरव करण्यात आला, तर खेळाडू तसेच स्पर्धेसाठी मेहनत घेतलेल्या कबड्डीतील ज्येष्ठ कबड्डीपटू, मान्यवरांचा आयोजकांच्या वतीने सन्मान करण्यात आला. (पान २ वर..)

## ५० टक्के आरक्षण ओलांडलेल्या झेडपी, पंचायत समित्यांची निवडणूक लांबणीवर

### सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलंडलेल्या स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे. त्यामुळे राज्यात आता २२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत.

महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सोमवारी (दि. २३) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी शासनाकडून तुषार मेहता यांनी केली, पण सुप्रीम कोर्टाने अशी परवानगी देता येणार नसल्याचे सांगितले.

दरम्यान, बांठिया आयोगाने महाराष्ट्रात दिलेल्या ओबीसी आरक्षणाच्या राजकीय वैधतेवर लवकरच अंतिम सुनावणीला सुरुवात होणार असल्याचे सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे. त्या सुनावणीत हा मुद्दा निकाली काढण्यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जातील.

## सोन्या-चांदीला पुन्हा झळाळी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वधारलेल्या सोने आणि चांदीच्या दरात गेल्या काही दिवसांत मोठी घसरण झाली होती. या दोन्हीच्या भावात सोमवारी (दि. २३) पुन्हा वाढ झाल्याचे पहायला मिळाले. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोन्याचे दर १५ हजार रुपयांनी वाढले, तर दुसरीकडे चांदीच्या दरातदेखील ३७०० रुपयांची तेजी दिसून आली.

सकाळी ट्रेडिंग सुरू झाले तेव्हा चांदीचे दर १५१७६ रुपयांनी वधारले. चांदीप्रमाणे सोन्याच्या दरातदेखील वाढ झाली आहे. इंडिया बुलियन ज्वेलर्स असोसिएशनने जाहीर केलेल्या दरांप्रमाणे २४ कॅरेट सोन्याचे दर १५८४३० रुपये प्रति तोळा आहेत.

## निवडक

### बाथरूमच्या फलकावर शिवराय, महाराणी पद्मिनी यांचा फोटो

**सिक्री :** हरयाणातील सिक्री येथील मिलान बँक्वेट हॉलमधील प्रसाधनगृहांबाहेर दिशादर्शक म्हणून छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी पद्मिनी यांचा फोटो लावण्यात आल्याचे समोर आले आहे. याचा व्हिडीओ व्हायरल झाला असून नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि इतिहासप्रेमींनी संताप व्यक्त केला आहे. सोशल मीडियावर अनेकांनी बँक्वेट हॉलवर कारवाईची मागणी केली. त्यानंतर दोन्ही फोटो हटविण्यात आले.

### भाजप नेते, माजी रेल्वेमंत्री मुकुल रॉय यांचे निधन



**कोलकाता :** देशाचे माजी रेल्वेमंत्री, तृणमूल काँग्रेसचे संस्थापक सदस्य आणि भाजप नेते मुकुल रॉय यांचे सोमवारी (दि. २३) वयाच्या ६९व्या वर्षी निधन झाले. ते स्मृतिभ्रंश व इतर आरोग्य समस्यांशी झुंज देत होते तसेच कोमात गेले होते. अपोलो रुग्णालयात उपचारादरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली.

# भाजपच्या दणक्याने रूबी मिल्स कंपनी व्यवस्थापन नरमले

### १५ दिवसांत मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन

### आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले चर्चेसाठी पत्र



**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील धामणी येथील रुबी मिल्स कारखान्यामधील कामगारांनी आपल्यावरील अन्यायाला वाचा फुटावी म्हणून भाजपप्रणित जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सोमवार (दि.२३)पासून काम बंद आंदोलनाचे हत्यार उपसले होते. या आंदोलनामुळे कंपनी व्यवस्थापनाने नरमाईची भूमिका घेत १५ दिवसांच्या आत सकारात्मक चर्चा करून कामगारांच्या मागण्या पूर्ण करू, असे आश्वासन लेखी पत्राद्वारे दिले. त्यामुळे काम बंद आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

या आंदोलनावेळी भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, भाजप खालापूर तालुकाध्यक्ष सनी यादव, राजेंद्र पालांडे, विठ्ठल मोरे, प्रसाद पाटील, रवींद्र पाटील, मनीष खवळे, उपाध्यक्ष विकास रसाळ, भरत महाडिक, रवी मोरे, जयेश पाटील, प्रसाद देशमुख, हरिभाऊ जाधव, विकास सावंत, निवृत्ती सालेकर, अविनाश सालेकर, मोहन घाडगे यांच्यासह कामगार, कार्यकर्ते उपस्थित होते. (पान २ वर..)

### ...तर पुढचे आंदोलन प्रतिकात्मक नसेल!

*यावेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, रुबी मिल्स कारखान्यातील कामगारांच्या पगारवाढ व अन्य मागण्यांसाठी आज केलेले आंदोलन प्रतिकात्मक होते, पण कंपनी व्यवस्थापनाने येत्या काळात सकारात्मक भूमिका घेऊन कामगारांच्या मागण्या पूर्ण केल्या नाही, तर यापुढचे आंदोलन प्रतिकात्मक नसेल. कंपनी व्यवस्थापन आपल्याला हलक्यात घेत असेल, तर यांचा टांगा पलटी करायला आपण केव्हाही तयार आहोत तसेच युनियन व कामगारांना विश्वासात घेऊन कंपनीने जर काम केले पूर्ण ताकदीने त्यांना सोबत दिली पाहिजे हा माझासुद्धा आपणा सर्वांना आग्रह आहे. आज कंपनीच्या गेटवर बसण्याची वेळ आली आहे. दुर्दैवाने मॅनेजमेंटने ही वेळ पुन्हा आणली, तर गेटचे टाळे आम्ही लावू आणि आम्हीच उघडू तेव्हा ते उघडेल, असा इशाराही त्यांनी दिला.*

## बारावी पेपरफुटीप्रकरणी कोचिंग क्लास चालकासह विद्यार्थ्याला बेड्या

**नागपूर : प्रतिनिधी**



नागपूर येथील बारावीच्या दोन पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाअंती दोघांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये कोचिंग क्लास चालकासह एका विद्यार्थ्याचा समावेश आहे. यामागे एखादे रॅकेट असण्याची शक्यता असल्याने पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

निशिकांत मूल (४५, मानकापूर) असे ट्युशन क्लासेस चालवणाऱ्या संचालकाचे नाव आहे. त्याच्यासह फरहान अख्तर या विद्यार्थ्यालाही अटक करण्यात आली आहे. सेंट उर्सुला हायस्कूल परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षकामुळे हा प्रकार उघड झाला होता. यात रसायनशास्त्राचा पेपरच्या वेळेपूर्वीच व्हॉट्सअ‍ॅपवर प्रश्नपत्रिका आल्याचे पुढे आले होते. वारंवार प्रसाधनगृहात गेलेल्या विद्यार्थिनीवर संशय आल्याने तिची झडती घेतली असता स्मार्टफोन आढळून आला. त्यानंतर हा मोबाईल जप्त करत तपासणी केली असता मोबाईलमध्ये परीक्षा सुरू होण्यापूर्वीच पेपर, प्रश्नांसोबत उत्तरेही एका व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर आढळून आली. २१ सदस्यांच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर निशिकांत मूलच्या क्रमांकावरून पेपर पाठवल्याचे उघड झाले.

बारावीच्या विज्ञान शाखेचे फिजिक्स आणि केमिस्ट्रीचा पेपर परीक्षेच्या तासाभरापूर्वीच व्हॉट्सअ‍ॅपवर आल्याची माहिती आहे. दोघांनाही न्यायालयाकडून चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, ही प्रश्नपत्रिका नेमकी कुठून आली? यात आणखी कोणाचा सहभाग आहे? याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## ५१ लाख विद्यार्थ्यांकडून 'हिंद-दी-चादर'चा जयघोष

### ■ गीत गायनाच्या विश्वविक्रमाची बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्डमध्ये नोंद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



हिंदुस्थानी संस्कृती आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे श्री गुरू तेग बहादूर जी यांच्या ३५०व्या शहिदी समागमानिमित्ताने सोमवारी (दि. २३) एक अभूतपूर्व इतिहास रचला गेला. कोकण विभागातील २० हजार शाळांमधील तब्बल ५१ लाख विद्यार्थ्यांनी एकाच वेळी सुप्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गायलेले हिंद-दी-चादर हे गीत सादर केले. या ऐतिहासिक उपक्रमाची दखल बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्डने घेतली आहे.

नेरूळ येथील गुरू गोविंदसिंग एज्युकेशन अकॅडमीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मुख्य कार्यक्रमाला नवी मुंबईच्या महापौर महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, सहआयुक्त विजय म्हासाळ, कोकण विभागाचे माहिती उपसंचालक मनोज सानप, सहाय्यक आयुक्त डॉ. सागर घोलप, शिक्षणाधिकारी अशोक कडूस, मनपा शिक्षण विभागाच्या सहाय्यक आयुक्त दिपाली दिवेकर, जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोडे तसेच गुरुबचन सिंग सिंघल, जसपाल सिंग नागरा, नगरसेवक कुलदीप सिंग सुरी, जसविंदर सिंग, मुख्याध्यापिका अमरजित कौर सेनी आणि ज्येष्ठ पत्रकार बी.पी. नायर यांची प्रमुख उपस्थिती होती. महापौर पाटील यांनी आगामी २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी खारघर येथे होणाऱ्या भव्य सोहळ्यास सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले.

महापौर पाटील पुढे म्हणाल्या की, गुरू तेग बहादूर सिंग यांचे बलिदान केवळ शीख समाजासाठी नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून खारघर सेक्टर २९ येथे आयोजित होणाऱ्या या भव्य समागमात जगभरातून १५ ते २० लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. अशा विश्वविक्रमी उपक्रमात सहभागी होण्याचे भाग्य लाभल्याचे मनस्वी समाधान आहे.

विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक उपसंचालक मनोज सानप यांनी, तर सूत्रसंचालन माहिती कार्यालयाच्या सहाय्यक संचालक संजीवनी जाधव-पाटील यांनी केले.

## तलावात बुडून मुलाचा मृत्यू

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील हंबरपाडा ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या तुंगी गावात असलेल्या तलावात बुडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. ओंकार उर्फ मुक्या भरत आसवले असे मयत मुलाचे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार ओंकार हा २१ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास गावालगतच्या तलाव परिसरात गेला होता. पाण्यात पडून तो बुडाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संध्याकाळपर्यंत मुलगा घरी न परतल्याने कुटुंबियांनी शोधाशोध सुरू केली, मात्र रात्री उशिरापर्यंत त्याचा ठावठिकाणा लागला नाही. अखेर रविवारी दुसऱ्या दिवशी सकाळी तलावातच त्याचा मृतदेह आढळून आला. याबाबत नेरळ पोलिसांना माहिती देण्यात आली असून तपास सुरू आहे.

## मुंबई-पुणे महामार्गावर अपघातानंतरच्या वाहतूक कोंडीमुळे महिलेचा नाहक बळी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे महामार्गावर रविवारी रात्री खोपोली हद्दीत मिळवाडी उतारावर कार आणि बसचा अपघात घडला. या वेळी विचित्र परिस्थितीमुळे वाहतूक कोंडी होऊन या अपघाताशी संबंध नसलेल्या एका महिलेचा नाहक बळी गेल्याची दुर्दैवी घटना घडली.

महाबळेश्वरहून कल्याणकडे जाणारी मिनीबस रविवारी रात्री खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत मीळ ठाकूरवाडीदरम्यात घाटातून उतरत होती. रात्र गडद होती, रस्ता तीव्र उताराचा आणि पुढे धोकादायक वळण होते. अचानक या बसचे चाक पंक्चर झाले. ड्रायव्हरने बस रस्त्यावरच थांबवली, पण जागा धोक्याची होती. त्याने तेथेच चाक बदलण्याचे काम सुरू केले. तेवढ्यात मागून वेगात येणाऱ्या कार चालकाचे त्या वळणावर नियंत्रण सुटले आणि कार जोरात बसला धडकली आणि क्षणात उलटली.

या अपघातात बसमधील तीन प्रवासी किरकोळ जखमी झाले तसेच कारमधील लोकही जखमी अवस्थेत बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होते, पण अपघातानंतर अपेक्षित असलेली सहानुभूती तिथे दिसली नाही. अपघातग्रस्त बसमधील विशेषकरून महिला प्रवाशांनी कारमधील जखमी प्रवाशांनाच दोष देत मारहाण सुरू केली. त्यामुळे जखमी अवस्थेतही कारमधील प्रवासी जीवाच्या भीतीने रस्त्यावरून खाली दरीकडे पळाले आणि अंधारात लपून बसले. यातील पाच जणांपैकी केवळ दोघेच रात्री सापडले. उरलेल्या तिघांचा शोध सुरूच राहिला.

दरम्यान, खोपोलीतील हेल्प फाउंडेशनचे सदस्य आणि स्थानिक लोक मदतीसाठी पोहचले, पण त्यांनाही बसमधील पॅसेंजरकडून यायला इतका उशीर का असा सवाल करून शिवीगाळ करण्यात आली. बस बाजूला घेऊ नका, पोलीस येईपर्यंत हलवू नका असा हट्ट धरला गेला. यामुळे रस्ता पूर्णपणे बंद झाला. वाहतूक कोंडी वाढत गेली. दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा लांबत गेल्या. (पान २ वर..)

# ‘खालापूर तालुका शिक्षण मंडळाच्या गैरकारभारावर आमदार प्रशांत ठाकूर विधानसभेत आवाज उठवणार’

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या कारभारावर संस्थेचे सदस्य व भाजप नेते यशवंत साबळे यांनी आज आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत गंभीर स्वरूपाचे घनाघाती आरोप केल्याने संस्थेच्या कारभाराची लक्तरे त्यांनी वेशीवर टांगली. पत्रकारांना माहिती देताना साबळे यांनी अनेक गैरव्यवहाराचे संदर्भ देताना विद्यमान कार्यकारणीच्या गैरकारभाराचे वाभाडेच काढले. या प्रकरणाची पनवेलचे आमदार तथा भारतीय जनता पक्षाचे नेते प्रशांत ठाकूर यांनी गंभीर दखल घेतली असून विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात या संस्थेच्या कारभाराबाबत आवाज उठवणार असल्याचे सांगितले.



दरम्यान या पत्रकार परिषदेला खोपोली भाजपा अध्यक्ष अजय इंगुलकर, अध्यात्मिक सेलचे काशिनाथ पारठे, सामाजिक कार्यकर्ते प्राध्यापक मुकेश रूपवते, भाजप युवा नेते संजय तन्ना,ऍड सिद्धेश जितकर, सामाजिक कार्यकर्त्या वंदना मोरे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते

यशवंत साबळे यांनी संस्थेच्या कारभारात अनेक त्रुटीचा पाढाच वाचताना अनेक गैरव्यवहाराचे काही पुरावे पत्रकारांपुढे सादर केले. संस्थेत निवृत्त झालेल्या कार्यालयीन स्टाफला पुन्हा त्याच ठिकाणी ठेवले जाते त्यांच्या पगारात पाच बेरोजगार तरुणांना रोजगार मिळू शकतो, याचे कारण सांगताना विद्यमान कार्यकारणीतील सदस्यांच्या अनेक गैरव्यवहाराची माहिती या निवृत्त झालेल्या स्टाफला असल्यामुळे त्यांना निवृत्त झाल्यानंतरही पुन्हा ठेवण्यामागे गौडबंगालची माहिती त्यांनी दिली.

संस्थेला अडचणीत आणण्याचे षडयंत्र सध्या रचले जात असल्याचा धक्कादायक प्रकार सांगताना ही एकमेव संस्था अन्य संस्थेत विलीन करण्याचा डाव रचला जात असल्याचे पण त्यांनी सांगितले. भारतात कुठेही सदस्य होताना २५ लाख भरावे असा ठराव करण्यात आल्याचे साबळे यांनी सांगताना, सर्वसामान्यांनी या संस्थेच्या कारभारात सहभाग घेऊच नये हा याचा या मागचा कुटील डाव असल्याचे त्यांनी सांगितले.

नियमाप्रमाणे आपण सदस्य फी भरल्यानंतर सर्वप्रथम या संस्थेने विधी महाविद्यालयाची शासनाकडून परवानगी आणली त्यात एकही पैसा आपण खर्च केला नसल्याचे सांगताना याबाबत रायगडचे खासदार श्रीरंग बारणे व राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मोलाचे साथ दिल्याचे आवर्जून सांगितले. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष हे खालापूर नगरपंचायत चे नगरसेवक आहेत त्यांनी त्या ठिकाणीही २३ लाख रुपयांचे फोटोचे बिल एका नगरसेवकास अदा केल्याचा किस्सा साबळे यांनी सांगितले. संस्था अध्यक्षांच्या मनमानीचा किस्सा सांगताना सर्वसाधारण सभेचे जाहीर प्रसिद्धीकरण करणे आवश्यक असताना ते न करता सर्वसाधारण सभा आयोजित केली जाते व त्यातही मनमानी करून ठराव संमत केल्याचे साबळे यांनी धक्कादायक क माहिती दिली. अलीकडे झालेल्या सभेत आपणास सदस्य असताना निमंत्रण न देता आपणास चुकीचा ठराव करून संस्थेबहेर काढल्याचा धक्कादायक प्रकारही त्यांनी उपस्थित पत्रकारांना सांगितले.

संस्थेच्या या कारभाराबाबत रायगडचे धर्मादाय आयुक्तनां लेखी माहिती दिली असतानांही त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही याबाबत ॲडव्होकेट सिद्धेश जितकर यांनीही या वृत्तास दुजोरा दिला. तर अलिबागचे धर्मादाय आयुक्त हे गेल्या सहा महिन्यापासून आम्हाला तारीख पे तारीख देत आहेत त्यांनी जर यावर निकाल सकारात्मक दिला नाही तर वरिष्ठ पातळीवर आम्हाला दाद मागावी लागेल असेही यावेळी जीतेकर वकील यांनी सांगितले.

दरम्यान याच विषयाबाबत भारतीय जनता पक्षातर्फे संस्थेच्या कार्यालयावर आज सोमवारी मोर्चा आयोजित केला होता परंतु पोलिसांनी जमावबंदीचा आदेश असल्यामुळे परवानगी नाकारली व आता पुढील मार्च महिन्यात परीक्षा संपल्यानंतर संस्थेला दिलेल्या लेखी पत्राबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला नाही तर शहर नव्हे तर तालुक्यातूनही भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांचे भव्य मोर्चा आयोजित करणार असल्याचे भाजपा शहर अध्यक्ष अजय इंगुलकर यांनी यावेळी बोलताना सांगितले. याच प

## आई-वडिलांशी वादानंतर घर सोडलेला मुलगा सुरक्षित परत

**चौक : प्रतिनिधी**

आज खोपोली रेल्वे स्टेशन परिसरात एक हृदय पिळवटून टाकणारी पण शेवटी समाधान देणारी घटना घडली. हेल्प फाउंडेशनचे सदस्य समीर लिमये यांना स्टेशन परिसरात एक अल्पवयीन मुलगा संशयास्पद अवस्थेत एकटा फिरताना आढळून आला. चौकशी केल्यानंतर त्याने आपले नाव अल्ताफ अली मोहम्मद शेख (रा. विठ्ठलवाडी) असे सांगितले. आईसोबत किरकोळ वाद झाल्यामुळे कोणालाही न सांगता तो लोकलने खोपोली येथे आला असल्याचे त्याने सांगितले. त्याच्या चेहऱ्यावरची भीती, अस्वस्थता आणि घराची ओढ स्पष्ट दिसत होती.



परिस्थितीची गंभीरता ओळखून हेल्प फाउंडेशनच्या टीमने कोणताही विलंब न करता त्या मुलाला सुरक्षितरित्या खोपोली पोलीस स्टेशन येथे आणले. तेथे त्याच्या वडिलांशी संपर्क साधण्यात आला. दरम्यान, आपल्या मुलाचा शोध घेत चिंतेने व्याकुळ झालेले आई-वडीलही काही वेळातच पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाले.

पोलीस स्टेशनमध्ये झालेली ती भेट अत्यंत भावनिक होती. आई-वडिलांनी आपल्या मुलाला मिठीत घेतले आणि सगळ्यांच्या डोळ्यांत नकळत पाणी तरळले. एका छोट्याशा गैरसमजातून घरापासून दूर गेलेला मुलगा पुन्हा सुरक्षितपणे कुटुंबाच्या स्वाधीन झाला.खोपोली पोलीस स्टेशनचे निरीक्षक सचिन हिरे यांनी मुलगा आणि त्याच्या पालकांना समज देत कौटुंबिक संवादाचे महत्त्व पटवून दिले. छोट्या वादातून मोठे निर्णय न घेण्याचा सल्ला देत कुटुंबाला समुपदेशन करण्यात आले.हेल्प फाउंडेशनच्या सदस्यांच्या मुळे कुटुंब पुन्हा एकत्र आले

## श्रीवर्धन पालिका आणि संत निरंकारी मिशन यांचा समुद्रकिनारा स्वच्छता संयुक्त उपक्रम

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

स्वच्छतेतून सुंदरतेकडे आणि स्वच्छ श्रीवर्धन आपली सामूहिक जबाबदारी या संदेशांना साकार रूप देत श्रीवर्धन शहरात भव्य समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम उत्साहात आणि मोठ्या जनसहभागात पार पडली.



श्रीवर्धन नगरपरिषदेच्या पुढाकारातून आणि संत निरंकार मिशनच्या अनुयायांच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमाने पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला. पहाटेपासूनच समुद्रकिनाऱ्यावर स्वयंसेवक, नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी, स्थानिक नागरिक आणि युवक-युवती मोठ्या संख्येने एकत्र आले. किनाऱ्यावर साचलेला प्लास्टिक कचरा, थर्माकोल, कागद, काचेच्या बाटल्या, फेकलेल्या जाळ्या तसेच इतर टाकाऊ वस्तू वेचून परिसर स्वच्छ करण्यात आला. काही स्वयंसेवकांनी कचऱ्याचे वर्गीकरण करून पुनर्वापरयोग्य वस्तू वेगळ्या केल्या, तर जैविक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करण्यात आली.या मोहिमेचे विशेष आकर्षण म्हणजे नवनिर्वाचित नगराध्यक्ष अतुल चौघुले यांचा थेट सहभाग. त्यांनी स्वतः हातात हातमोजे घालून कचरा उचलत नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, शहर स्वच्छ ठेवणे ही केवळ नगरपरिषदेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक कर्तव्य आहे. पर्यटकांचे आवडते ठिकाण असलेल्या श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याचे सौंदर्य जपणे आपली प्राथमिकता आहे.संत निरंकार मिशनच्या स्वयंसेवकांनी स्वच्छतेसोबतच पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती केली. प्लास्टिकचा वापर कमी करण्याचे आवाहन, कचरा योग्य ठिकाणी टाकण्याची सवय आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखण्याचे महत्त्व याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. स्वच्छता ही सेवा या भावनेतून स्वयंसेवकांनी श्रमदान केले.

या उपक्रमामुळे समुद्रकिनाऱ्याचे नैसर्गिक सौंदर्य अधिक खुलून आले आहे. स्वच्छ आणि निरोगी वातावरणामुळे पर्यटकांना सकारात्मक अनुभव मिळणार असून स्थानिक नागरिकांनाही अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. व्यापाऱ्यांनीही या मोहिमेचे स्वागत करत भविष्यात अशा उपक्रमांत सहभागी होण्याची तयारी दर्शविली.नगरपरिषदेकडून येत्या काळात नियमित स्वच्छता मोहीम, शाळा-महाविद्यालयांत जनजागृती कार्यक्रम आणि प्लास्टिकमुक्त श्रीवर्धन अभियान राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. प्रशासन आणि सामाजिक संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांतून श्रीवर्धन शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

## पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व शाळांमध्ये सामूहिक गायनाचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदुस्थानी संस्कृती आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम निमित्ताने आज कोकण विभागात एक अभूतपूर्व इतिहास रचला गेला. कोकण विभागातील २० हजार शाळांमधील तब्बल ५१ लाख विद्यार्थ्यांनी एकाच वेळी सुप्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गायलेले ‘हिंद-दी-चादर’हे गीत सादर केले. या ऐतिहासिक उपक्रमाची दखल ‘बेस्ट ऑफ इंडिया’ रेकॉर्डने घेतली असून, पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील विके हायस्कूल येथे झालेल्या कार्यक्रमांत पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी आगामी २८ फेब्रुवारी आणि ०१ मार्च रोजी खारघर येथे होणाऱ्या भव्य सोहळ्यास सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, आवाहन केले आहे.

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूरजींच्या ३५० व्या शहिदी समागम निमित्त पनवेलच्या वि के हायस्कूल मध्ये सामूहिक गीत गायन उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विके हायस्कूल मधील विद्यार्थी आणि शिक्षकांनी सहभाग घेत समूह गायन केले. प्रमुख समन्वयक रामेश्वर नाईक यावेळी उपस्थित होते. पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांचे उपस्थितीत हे समूह गायन झाले.



## संत निरंकारी मिशनचे स्वच्छता अभियान : २२ ठिकाणी जल स्वच्छता मोहीम

**महाड : प्रतिनिधी**

पाणी हे निसर्गाचे अमूल्य वरदान आहे. जीवनाचा मूलाधार आणि मानवसभ्यतेची जीवनरेखा असलेले हे जल स्वच्छ व संरक्षित राहिले, तर केवळ पर्यावरणच नव्हे, तर मानवसमाजाचे एकूण आरोग्य आणि संतुलन अधिक सक्षम होते. मानवसेवा व लोककल्याणाच्या या दिव्य भावनेला साकार रूप देत संत निरंकारी मिशनच्या वतीने ‘प्रोजेक्ट अमृत’ अंतर्गत ‘स्वच्छ जल, स्वच्छ मन’ या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे आयोजन रविवारी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत, सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी राबविण्यात आले.

या अभियाना अंतर्गत रायगड जिल्ह्यातील नद्यांसह शहरातील विविध तलाव, विहीरी अशा २२ ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली. त्यामध्ये खोपोली, सावरोली, मार्केवाडी, तिवरे, पेण, बोर्वे, रोहा, कोंडगाव, अलिबाग, पोयनाड, सारळ, भिलजी, खरसई,



भरडखोल, श्रीवर्धन, वडवली, खरवली, कडापे, चोरवली, महाड, बिरवाडी तसेच रावतळी या ठिकाणचा समावेश आहे. ‘स्वच्छ जल, स्वच्छ मन’ अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे भव्य व प्रेरणादायी आयोजन सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज व निरंकारी राजपिता रमित जी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतातील २५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९३० शहरांमधील १ हजार ६०० हून अधिक ठिकाणी यशस्वीपणे पार पडले. या अभियानात सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला अशी माहिती संत निरंकारी मंडळाचे खरसई (रायगड) चे झोनल इंचार्ज प्रकाश म्हात्रे यांनी दिली.

## ज्येष्ठ छायाचित्रकार पत्रकार रजनीश काकडे यांचे निधन

**मुंबई: प्रतिनिधी**

द मुंबई प्रेस क्लबचे उपाध्यक्ष आणि ज्येष्ठ छायाचित्रकार पत्रकार रजनीश मंदार काकडे (वय ५५) यांचे सोमवार ( दि.२३) रोजी मुंबई येथे निधन झाले. त्यांच्या निधनामुळे माध्यम क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांची विनम्रता, तल्लख नजर, पत्रकारितेबद्दलची अढळ निष्ठा आणि नवोदितांना दिलेले प्रेमळ मार्गदर्शन यासाठी ते कायम स्मरणात राहतील.



रजनीश हे केवळ अनुभवी छायाचित्रकार नव्हते, तर अनेक पिढ्यांतील तरुण छायाचित्र पत्रकारांसाठी मार्गदर्शक होते. आपल्या कामातून त्यांनी अनेक ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण क्षण प्रामाणिकपणे व संवेदनशीलतेने टिपले. आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी अनेक छायाचित्रकार घडवले

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कारांचे मानकरी असलेल्या रजनीश यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात दैनिक सकाळ मधून केली. त्यानंतर ‘हिंदुस्तान टाइम्स’मध्ये तीन वर्षे काम केल्यानंतर ते आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्था ‘असोसिएटेड प्रेस’मध्ये दाखल झाले.

त्यांचेवर शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यातआले त्यांच्या पश्चात दोन भाउ व एक बहीण आहे.

पान १ वरुन

### पुरुषांमध्ये ओमकार वेश्वी, महिलांमध्ये कर्नाळा स्पोर्टस् अकॅडमी संघ विजेता

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यास स्पर्धा संयोजन समितीचे प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे व वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी जनरल सेक्रेटरी ॲड. आस्वाद पाटील, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, रायगड जिल्हा राज्य कबड्डी असोसिएशनच्या कार्यवाह चित्राताई पाटील, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा संघटक प्रमुख प्रसाद भोईर, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, नगरसेविका प्रतिभा भोईर, स्पर्धा सचिव आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक शरद कदम, शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर, प्रमोद म्हात्रे, कबड्डी असोसिएशनचे जिल्हा उपाध्यक्ष हिराचंद पाटील, प्रफुल्ल पाटील, ज्येष्ठ मार्गदर्शक जे.जे. पाटील, खजिनदार जगदीश पाटील, संजय मोकल, प्रथमेश पाटील, संदेश बैकर, जनार्दन पाटील, नरेश म्हात्रे, ओमकार पिंगळे, लक्ष्मण गावंड, अजिंक्य पाटील, पांडुरंग पाटील, संकेत पाटील, उल्हास पाटील, अनिल राऊत, माजी सरपंच चिंतामण भोईर, सी.एल. ठाकूर, अपूर्व ठाकूर, श्रीकुमार नायर यांच्यासह पदाधिकारी, प्रशिक्षक, कबड्डीप्रेमी जिल्ह्यातून मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कबड्डी हा आपल्या मातीतला अभिमानाचा खेळ आहे आणि या खेळाशी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अतूट नाते होते. याच भावनेतून या स्पर्धेत अजितदादांचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या कार्याची आणि खेळाप्रती असलेल्या निष्ठेची आठवण करून देत उपस्थितांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या प्रेरणेने कबड्डीचा हा वारसा पुढे नेण्याचा संकल्प सर्वांनी केला. स्पर्धा संयोजन सचिव शरद कदम यांनी संपूर्ण स्पर्धेचे उत्तमरित्या व यशस्वी आयोजन केल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

जनसामान्यांच्या हृदयात घर करणारे आणि समाजकार्यातून लोकांचे जीवन उजळवणारे लोकनेते रामशेठ ठाकूर हे नाव आज विश्वास, कार्यतत्परता आणि निःस्वार्थ सेवेचे प्रतीक बनले आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन समाजकारणालाच जीवनाचे ध्येय मानणाऱ्या या नेतृत्वाने गेली पाच दशके समाजसेवेची अखंड ज्योत प्रज्वलित ठेवली आहे. आजही त्याच ऊर्जेने आणि तळमळीने ते समाजहितासाठी कार्यरत आहेत. या स्पर्धेच्या निमित्ताने कबड्डी असोसिएशन व पदाधिकाऱ्यांच्या वतीने अमृत महोत्सवानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विशेष सत्कार व अभीष्टचिंतन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहात त्यांचा गौरव करत त्यांच्या समाजसेवेच्या प्रवासाला सलाम केला.

### भाजपच्या दणक्याने रूबी मिल्स कंपनी प्रशासन नरमले

रूबी मिल्स कारखान्यात गेल्या वीस वर्षाहून अधिक काळापासून काम करूनही १७ ते १८ हजार रुपये पगार मिळत असल्याने कामगारांनी पगारवाढीसाठी कंपनी व्यवस्थापनाकडे अनेक वेळा मागणी केली. त्याचप्रमाणे इतर काही मागण्या होत्या, मात्र याबाबत कंपनी व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका न घेतल्याने अखेर जवळपास १०० कामगारांनी जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून कंपनीच्या गेटसमोर सोमवारपासून काम बंद आंदोलन सुरू केले.

या आंदोलनात भाजपचे नेते तथा आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित दाखवत कामगारांना पाठबळ दिले. त्यामुळे आंदोलन सुरू होताच अवघ्या दोन तासांच्या आत रूबी मिल्स कंपनी व्यवस्थापन नरमले. कामगारांच्या पगारवाढीबरोबरच अन्य मागण्यांवर येत्या १५ दिवसांमध्ये सकारात्मक चर्चा करू, असे पत्र आमदार प्रशांत ठाकूर यांना कंपनी व्यवस्थापनाच्या वतीने देण्यात आले. त्यामुळे काम बंद आंदोलनाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली असून कामगारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

### मुंबई-पुणे महामार्गावर अपघातानंतरच्या वाहतूक कोंडीमुळे महिलेचा नाहक बळी

या रांगेतच एका कारमध्ये ४० वर्षीय महिला रसायनी परिसरातील भाजप नेते महादेव कांबळे यांच्या पत्नी संध्या कांबळे यांचा श्वास अडकू लागला. छातीत तीव्र दुखणे सुरू झाले. कुटुंबीय घाबरले. त्यांनी मदत मागितली, पण पुढे अपघात झाला आहे, रस्ता बंद आहे असे उत्तर मिळाले. प्रत्येक मिनिट जड होत होते. शेवटी मदतीला आलेल्या सर्वांनी संयम राखत बसमधील जखमींना रुग्णालयात पाठवले आणि अपघातग्रस्त वाहने बाजूला घेतली. मोठ्या प्रयत्नांनी रस्ता मोकळा झाला. तोपर्यंत उशीर झाला होता. रुग्णालयात पोहचण्याआधीच संध्या कांबळे यांचा मृत्यू झाला. ज्या अपघाताशी त्यांचा काहीही संबंध नव्हता, त्या अपघातानंतर निर्माण झालेल्या गोंधळाने मात्र या महिलेचा जीव घेतला. त्यांनी पनवेल तालुक्यातील वावेघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली होती. सामाजिक व धार्मिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यामुळे सर्वांनी हळहळ व्यक्त केली.

### दुखवटा

#### आनंदा साबळे



**नवी मुंबई :** रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे एपीआय संग्राम साबळे यांचे वडील आनंदा काशिनाथ साबळे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं, एक मुलगी आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मुळ गाव अमरधाम धुमाळवाडी, तालुका अकोले, जिल्हा अहिल्यानगर येथील स्मशानभूमीत २२ फेब्रुवारी रोजी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सिडकोच्या हलगर्जीपणामुळे कळंबोली वसाहतीत पाणीटंचाई; सिडकोवर मोर्चा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली वसाहतीमध्ये पाण्याचा पुरेसा साठा उपलब्ध असूनही केवळ सिडकोच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे स्थानिक नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे, अशी टीका भाजपचे जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील यांनी सोमवारी सिकडोकार्यालयावर काढण्यात आलेल्या धडक मोर्चावेळी केली.

कळंबोली येथील केएल, सेक्टर ४ई परिसरातील भागात दिवसापासून पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झालेला असून शेकडो कुटुंबांवर अक्षरशः पाणीबाणी ओढवली आहे. लोकांना जेवणासाठी, पिण्यासाठी तसेच बाथरूम साठीदेखील पाणी उपलब्ध नाही. वारंवार तक्रारी करूनही सिडको प्रशासनाने ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. कळंबोलीतील या गंभीर पाणी प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपच्या वतीने सिडको



कार्यालयावर धडक मोर्चा काढून सिडको पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता प्रफुल देवरे यांना जाब विचारण्यात आला.

यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील यांनी ठणकावून सांगितले, कळंबोली तील नागरिकांना पिण्यायोग्य पाणी मिळालेच पाहिजे आणि तो त्यांचा हक्क आहे. या संदर्भात पनवेल महापालिका सिडको अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन कळंबोलीतील नागरिकांना मुबलक पाणी मिळावे यासाठी प्रयत्न करण्यात येईल. जोपर्यंत पाणीपुरवठा सुरू होत नाही तो पर्यंत पर्यायी व्यवस्था तेथील नागरिकांना पिण्यायोग्य पाण्याच्या टँकरची सोय करण्याच्या सूचना दिल्या. स्त्रीशक्ती फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्ष विजया कदम यांनी सिडकोच्या पाणी पुरवठा अभियंता प्रफुल देवरे यांना जाब विचारत चांगलेच धारेवर धरत आक्रमक भूमिका घेतली.

दिवसापासून केएलमध्ये पाणी नाही, तरी प्रशासन झोपेत आहे का? आज पाणीपुरवठा सुरू झाला नाही तर शेकडो महिलांच्या उपस्थितीत इथेच ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला. यावेळी सिडको पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता प्रफुल देवरे यांनी माहिती दिली की सेक्टर ४ इ येथील पाईपलाईनमध्ये मेन व्हॉल्वच भाग अडकल्यामुळे निर्माण पाणी पुरवठा बंद होता, आज संध्याकाळपर्यंत आम्ही पाणी पुरवठा सुरळीत करू, असे आश्वासन दिले.

या धडक मोर्च्यावेळी गणेश लाड, तुकाराम तरसे, शरद मोहिते, निखिल कारेकर, राम पवार, विलास पाटील, मीना जांबुरने, स्वाती राळे, पुष्पा राळे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चोरलेला डंपर पनवेल पोलिसांनी आरोपीसह केला हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरातून चोरीस गेलेले टाटा कंपनींचा टिपर ट्रक (डंपर) अवघ्या आठ तासात पनवेल शहर पोलिसांनी डम्पर चोरणाऱ्या आरोपीसह हस्तगत केला आहे.



तक्रारदार नामे भास्कर घाडगे यांच्या मालकीचा ५०,००,००० रुपये किमतीचा डंपर गाडी (एमएच ४३ सीके ३०१८) हा करंजाडे सेक्टर २ए परिसरातून मध्यरात्री चोरीस गेली होती. नमूद वाहनाचा जीपीएस लोकेशन वरून तपास करत असताना वाहन पालघर, गुजरात दिशेला जात असल्याची माहिती प्राप्त झाली.

याप्रमाणे लागलीच वपोनी नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि विनोद लभडे, पोहवा परेश म्हात्रे, पोहवा योगेश दिवेकर, पोहवा अविनाश गांथडे, पोहवा महेंद्र वायकर, पोना विनोद देशमुख, पोना सम्राट डाकी, पो.उप.नि गोरख राठोड, नेम. पालघर डउइ, पो.उप.नि राकेश तळपडे, नेम. वलसाड डउइ, गुजरात, योगेश यांनी जीपीएस नुसार वाहनाचा पाठलाग करण्यासाठी पथक रवाना करण्यात आले होते.

हे वाहन महाराष्ट्र हद्द सोडून गुजरात राज्य हद्दीत गेल्याचे समजल्याने त्यास ताब्यात घेण्यासाठी पालघर व वलसाड डउइ सोबत संपर्क साधले होते, तरी वाहन गुजरात राज्यातील पारदी पोलीस ठाणे हद्दीत असल्याची माहिती मिळाली तरी हे वाहन व आरोपी हरियाणा जायचे आधीच वाहन व आरोपीसह ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी आरोपी मुरसलिम मकसूद खान (वय ३० वर्ष) याची सखोल चौकशी सुरु असून त्यांनी या पूर्वीसुद्धा अश्याच प्रकारचे डंपर चोरी केली आहे का याचा तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद लबडे करीत आहेत.

# मुलीचा विनयभंगप्रकरणी स्कूल व्हॅनचालकाला सक्तमजुरी व दंड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दहा वर्षीय मुलीचा विनयभंग करणाऱ्या स्कूल व्हॅनचालकाला पोक्सो कायदा कलम आठ अन्वये तीन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा आणि पाच हजार रुपये दंड तसेच पोक्सो कायदा कलम १० अन्वये पाच वर्षे सक्त मजुरीची शिक्षा आणि पाच हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली.

आरोपी सागर भारत चव्हाण राहणार (मोठा खांदा, गणेश टॉवरजवळ, सेक्टर १८) हा स्कूल व्हॅनवर काम करत असताना दहा वर्षीय पीडित मुलीला शाळेत जाण्यासाठी तिच्या आईने आरोपीच्या स्कूल व्हॅनमध्ये मागील सीटवर बसवले. व्हॅन पुढे आल्यानंतर त्या मुलीला चालकाने पुढील सीटवर बसण्यास सांगितले. आणि तिच्यासोबत गैर कृत्य केले. हा प्रकार आई-वडिलांना समजल्यानंतर आरोपी विरुद्ध खांदेश्वर पोलीस ठाण्यात पोकसो अंतर्गत २०२३ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले आणि पनवेल येथील विशेष न्यायालयात या खटल्याची सुनावणी पूर्ण झाली. विशेष सरकारी वकील प्रतीक्षा वडे-वारंगे यांनी सरकारी पक्षातर्फे काम पाहिले. यावेळी सहा साक्षीदार तपासण्यात आले.

यामध्ये पीडिता, पीडीतेचे वडील यांची साक्ष तसेच तपासीक अधिकारी एपीआय अमोल खाडे यांची साक्ष महत्त्वाची ठरली. विशेष सरकारी वकील प्रतीक्षा वडे- वारंगे यांनी न्यायालयासमोर केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी सागर भारत चव्हाण याला सक्त मजुरीची शिक्षा आणि दंड अशी शिक्षा ठोठावली.



**पनवेल : वास्तुकला आणि अंतर्गत सजावट क्षेत्रात नवनवीन संकल्पना राबवण्यासाठी सज्ज असलेल्या मिंट-आर्किटेक्चर अँड इंटीरिअर्स हे नवीन फर्म पनवेल शहरात नव्याने सुरू झाले आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन रविवारी झाले. यावेळी त्यांनी आर्किटेक्ट श्राव्या करुतुरी आणि आर्किटेक्ट प्रशंसा अहिर या दोन तरुण उद्योजिकांच्या धाडसाचे कौतुक करत त्यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या सोहळ्याला धनंजय करुतुरी, पद्म रोजा करुतुरी, भार्गव ठाकूर, अपूर्व ठाकूर आदी उपस्थित होते.**

# संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त पनवेल मनपातर्फे अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका मुख्यालयात सोमवारी (दि.२३) थोर किर्तनकार, समाजसुधारक संत गाडगे बाबा यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी आयुक्त मंगेश चितळे, पालिका सदस्य बबन मुकादम, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त रवीकिरण घोडके, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त नानासाहेब कामठे, उपसचिव अक्षय कदम, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जेएनपीटी महामार्गावर विवाहितेचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-जेएनपीटी महामार्ग हा दिवसेंदिवस दुचाकीस्वारांसाठी जिवघेणा ठरत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. रविवारी दुपारी लग्न समारंभ आटपून घरी परतणाऱ्या एका ३९ वर्षीय विवाहितेला ग्रीट पावडरने भरलेल्या डंपरने चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली. या भीषण अपघातात स्वप्ना भोईर यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचे पती मिथुन भोईर गंभीर जखमी झाले.

न्हावा गावात राहणारे स्वप्ना आणि मिथुन भोईर हे दाम्पत्य कर्जत येथील नातेवाइकांच्या लग्नसमारंभाला उपस्थित राहून दुचाकीवरून घरी परतत होते. दुपारी सव्वा तीनच्या सुमारास पनवेल-जेएनपीटी महामार्गावरील गव्हाणफाटा येथील कान्होबा ढाब्याजवळ त्यांच्या दुचाकीला मागून येणाऱ्या डंपरने जोरदार धडक दिली. धडकेनंतर स्वप्ना या थेट डंपरच्या मागील चाकाखाली आल्या आणि त्यातच त्यांचा जागीच मृत्यू झाला. मिथुन हे काही अंतरावर फेकले गेल्याने गंभीर जखमी अवस्थेत पडले होते.




या महामार्गावर लहान-मोठे दगड, ग्रीट पावडर वाहून नेणाऱ्या डंपर चालकांमध्ये लवकर माल पोहचवून पुन्हा फेरी मारण्याची जणू स्पर्धाच सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे भरधाव वेग, निष्काळजी वाहनचालना आणि प्रचंड धुळीमुळे अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. गव्हाणफाटा परिसराला परिवहन विभागाने अपघातप्रवण क्षेत्र (ब्लॅक स्पॉट) म्हणून घोषित केले असले, तरी प्रत्यक्षात अपघात रोखण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

अपघातानंतर स्वप्ना यांचा मृतदेह डंपरच्या चाकाखाली अडकलेला असल्याने तो बाहेर काढण्यासाठी क्रेनची मदत घ्यावी लागली. या अपघातानंतर डंपरचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले तसेच स्वप्ना यांच्या डोक्यात हेल्मेट पोलिसांना घटनास्थळी सापडले नसल्याचे पोलिसांनी सांगितले. या गंभीर अपघाताची चौकशी सहाय्यक पोलीस निरीक्षक सूनील वाघ हे करीत आहेत.

**अपघाती मृत्यूची मालिका**

नवी मुंबईमध्ये २०२४ साली २८६ जण रस्ते अपघातामध्ये मृत्यूमूखी पडले तर २०२५मध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या २६७वर आली. अजूनही अपघाती मृत्यूची मालिका सुरूच आहे. वाहतूक पोलिसांनी मागील दोन वर्षात १८,६८,५७६ जणांवर कारवाई करून कोट्यावधींचा दंड जमा केला, मात्र रस्ते अपघात रोखण्यामध्ये मोठे यश पोलिसांनादेखील आले नाही. पोलीस आणि परिवहन विभागाला (आरटीओ) रस्ते अपघात रोखण्यासाठी वर्षभर झोकून काम करावे लागणार आहे.





**पनवेल : न्हावेखाडी मोठा पाडा येथील गावधनी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त श्री सत्यनारायण पूजा आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे तसेच अपूर्व प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. आयोजकांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य नरेश मोकल, ललिता ठाकूर, गोपीचंद ठाकूर, सतिश ठाकूर, वैभव म्हात्रे, गणेश मोकल, हरेश्वर कडू आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.**

# स्नेहा कोरडेची फॅशन शोमध्ये दमदार कामगिरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खांदा कॉलनीमधील सीकेटी कॉलेज येथील टी.वाय. बी.एस्सी.(फॅशन डिझाइन) शाखेची विद्यार्थिनी स्नेहा सुनिल कोरडे हिने आपल्या उल्लेखनीय कामगिरीने महाविद्यालयासह कोन गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या निर्मिती २०२५-२६ फॅशन शोमध्ये स्नेहा हिने विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट यश संपादन करत एकूण पाच सर्टिफिकेट्स व पाच ट्रॉफीज पटकावल्या. यामध्ये सर्वोत्कृष्ट पृष्ठभाग अलंकरण, सर्वोत्तम आदिवासी प्रेरित संग्रह, वर्षातील विद्यार्थिनी (Student of the Year) तसेच इतर विशेष कामगिरीबद्दल गौरव करण्यात आला. तिच्या एकूण उत्कृष्ट सादरीकरणामुळे परीक्षक व उपस्थितांकडून तिचे विशेष कौतुक करण्यात आले.



या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व प्राचार्य प्रा.डॉ. एस.के. पाटील यांच्या हस्ते स्नेहा हिला ट्रॉफी व सर्टिफिकेट प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

स्नेहा ही कोन गावची रहिवासी असून तिच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून आई-वडिलांचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

# संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त प्रभाग १८मध्ये स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १८ अंतर्गत संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त सोमवारी (दि.२३) सकाळी सावरकर चौक व विसर्जन घाट परिसरात महापौर नितीन पाटील यांच्या सक्रिय सहभागातून विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान सावरकर पुतळा परिसर, घाट परिसर तसेच बल्लाळेश्वर तलावाच्या आतील साचलेला कचरा काढून संपूर्ण परिसराची साफसफाई करण्यात आली.

यावेळी महापौरांनी स्वच्छतेबाबतची बांधिलकी कृतीतून दाखवून देत त्यांनी उपस्थित सफाई कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. स्वच्छता काम अधिक प्रभावी, शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

या उपक्रमावेळी मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक जयेश कांबळे, स्वच्छता निरीक्षक महेंद्र भोईर तसेच सर्व मुकादम व सफाई कर्मचारी उपस्थित होते.



# भाजप नेते महादेव कांबळे यांना पत्नीशोक; संध्या कांबळे यांचे निधन

**रसायनी : रामप्रहर वृत्त**



रसायनी परिसरातील भाजपचे नेते महादेव कांबळे याचया सुविद्य पत्नी संध्या कांबळे (वय ४०) यांचे रविवारी (दि.२२) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती व दोन अविवाहित मुले, असा परिवार आहे.

संध्या कांबळे यांनी पनवेल तालुक्यातील वावेघर ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली होती. सामाजिक व धार्मिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. विविध उपक्रमांमधून त्यांनी जनसंपर्क वाढवत लोकहिताच्या कामांना प्राधान्य दिले होते.

कै. संध्या कांबळे यांचा जलदान विधी, पुण्यानुमोदन व शोकसभा कार्यक्रम बुधवारी (दि.२५) सकाळी ११ वाजता हरी ओम पार्क, चांभाली येथे त्यांच्या राहत्या घरी होणार आहे.

**पनवेल : येथील महात्मा फुले महाविद्यालयातील सेवानिवृत्त ऑफिस सुप्रिडंट जयवंत काशिनाथ मढवी (वय ७९, मूळ रा. चिर्ले, उरण) यांचे शनिवारी निधन झाले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कै. मढवी यांना आदरांजली वाहिली. या वेळी ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख उपस्थित होते.**



## संपादकीय

# हिंसेचा निर्धाराने बिमोड

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देशातील हिंसक नक्षलवादी चळवळ संपुष्टात आणण्याचा निर्धार केला असून ३१ मार्च २०२६ पूर्वी देश पूर्णपणे नक्षलमुक्त करण्याचे उद्दिष्ट त्यांनी यापूर्वीच जाहीर केले आहे. त्यापार्श्वभूमीवर देवजी या सर्वोच्च माओवादी नेत्याने रविवारी आत्मसमर्पण केल्याने त्याला महत्त्व दिले जात आहे. बसवराजूनंतर देवजी हा देशातील नक्षल चळवळीचा प्रमुख मानला जात होता. देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठे आव्हान असलेला नक्षलवाद आता पूर्णपणे संपुष्टात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

**सुरक्षा यंत्रणांच्या हिटलिस्टवर असलेला नक्षल संघटनेचा महासचिव थिप्परी तिरुपती उर्फ देवजी याने रविवारी तेलंगणात आत्मसमर्पण केले. आपला समर्थक सीसीएम सदस्य संग्राम याच्यासह त्याने तेलंगणा पोलिसांसमोर शरणागती पत्करली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नक्षलवादी चळवळ संपुष्टात आणण्याचा निर्धार केला असून ३१ मार्च २०२६ पूर्वी देश पूर्णपणे नक्षलमुक्त करण्याचे उद्दिष्ट त्यांनी जाहीर केले आहे. देवजी या चळवळीचा मुख्य रणनीतीकार मानला जात असल्यामुळे नक्षल चळवळीच्या इतिहासातील आतापर्यंतचे हे सर्वात महत्त्वाचे आत्मसमर्पण म्हटले जाते आहे. एनआयएच्या सर्वात वॉन्टेड गुन्हेगारांच्या यादीत देवजीचा समावेश होता. अमित शहा यांनी जाहीर केलेल्या मोहिमेनुसार छत्तीसगड, महाराष्ट्र, तेलंगण सीमावर्ती भागात नक्षलविरोधी कारवाईला वेग देण्यात आला. छत्तीसगडमध्ये देवजीवर १.५ कोटी रुपयांचे तर संग्रामवर एक कोटींचे इनाम होते. महाराष्ट्र, तेलंगणसह विविध राज्यांमध्ये देवजीवर एकूण दहा कोटींचे बक्षिस होते. नक्षल्यांचा सर्वोच्च नेता बसवराजूनंतर सारी सूत्रे देवजीच्या ताब्यात आली होती. गेल्या वर्षी मे महिन्यात छत्तीसगडमधील एका चकमकीत २७ माओवाद्यांसह बसवराजूला पोलिसांनी ठार केले होते. तेव्हापासून आंतरराष्ट्रीय संपर्क, शस्त्रास्त्रांचा पुरवठा आणि नियोजनपूर्वक मोठे हल्ले करणे या साऱ्याचे नियोजन देवजी करत होता असे सांगितले जाते. तो ताब्यात आल्यामुळे आता देशातील नक्षलवादी चळवळीचा कणा मोडून पडल्यासारखेच आहे. देवजी म्हणजेच थिप्परी तिरुपतीचा जन्म तेलंगणातील सध्याच्या जगतियाल जिल्ह्यातील एका दलित कुटुंबात झाला होता. १९८०च्या दशकात महाविद्यालयीन शिक्षणादरम्यान तो विद्यार्थी राजकारणात उतरला व पुढे दंडकारण्यात गेला. जवळपास १५ वर्षे तो गडचिरोलीत कार्यरत होता. संजीव, चेतन आदी निरनिराळ्या नावांनी त्याने माओवादी पार्टीमध्ये काम केले. छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांवर झालेल्या अनेक मोठ्या हल्ल्यांचे नियोजन त्यानेच केले होते. आता तो पोलिसांच्या ताब्यात आल्याने नक्षलींच्या पुढील कारवाया उलथून टाकण्यात पोलिसांना यश मिळेल. गेल्या चार दशकांपासून पोलिस त्याला पकडण्याच्या प्रयत्नात होते. सध्या ६२ वर्षांचा असलेला हा नक्षलवाद्यांचा मास्टरमाइंड ढासळत्या प्रकृतीमुळे शरण आला असावा. अलीकडच्या काळात देशातील नक्षल प्रभावित क्षेत्रांचा आढावा केंद्र सरकारकडून घेण्यात आला, तेव्हा नक्षलबाधित जिल्ह्यांची संख्या आठवरून सातवर आल्याचे आढळून आले. केंद्रीय गृह मंत्रालयाने नक्षल प्रभावित क्षेत्रांचे नवीन वर्गीकरण ९ फेब्रुवारीपासून लागू केले. यात जिथे नक्षलवादी हिंसाचार आणि हालचाली अद्याप सक्रिय आहेत अशा जिल्ह्यांची संख्या सातवर आल्याचे नमूद करण्यात आले. सरकारने या हिंसक चळवळीचा बिमोड करण्याचा दृढनिश्चय केल्यानेच हे साध्य झाले. अलीकडच्या काळात नक्षलींना आदिवासींकडूनही पाठिंबा मिळेनासा झाला आहे. आदिवासी भागांतील विकासकामांचाही त्यात हातभार आहे. आदिवासींचा जंगलांवरील हक्क अबाधित राहिल्यास कुणीही त्यांची दिशाभूल करू शकणार नाही.**

# जागतिक मुद्रण दिन विशेष

आज मुद्रणाचे आपल्या जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. नव्या तंत्रसाधनांच्या आगमनामुळे तर मुद्रण जनसामान्यांच्या आवाक्यात आले आहे. कार्यालयांतली कागदपत्रे असोत वा साहित्यपर वा इतर पुस्तके, मुद्रणसाधनांतील प्रगतीमुळे पूर्वीपेक्षा मुद्रणाचे प्रमाण नक्कीच वाढलेले दिसेल. आताशा डिजिटल माध्यमाचा प्रसार होऊ लागला असला तरी मुद्रण हेच अजूनही अनेकांना सोयीचे आहे.

बँका आणि इतर खासगी कार्यालये या ठिकाणी व्यवहारांत मुद्रणाचे महत्त्व मोठे आहे. जितके कर्मचारी तेवढे संगणक आणि जवळ जवळ तितक्याच संख्येने छपाईयंत्रे म्हणजे प्रिंटर्स, असे चित्र दिसते. प्रत्येक व्यवहार हा आधी संगणकावर आणि नंतर लगेचच छापलेल्या कागदावर!

दर वर्षी २४ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक मुद्रण दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. मुद्रणकलेचा जनक योहानेस गुटेनबर्ग यांचा जन्मदिन 'जागतिक मुद्रण दिन' म्हणून साजरा केला जातो. मुद्रण कलेच्या शोधामुळेच आज आपण वैचारिकदृष्ट्या समृद्ध आहोत. आज आपण सोशल मीडिया क्षेत्रात केलेली प्रगतीही



मुद्रण कलेचा उत्तम नमुना आहे.

जर्मनीतील गुटेनबर्ग यांनी अक्षराचे सुटे खिळे बनविण्याचा शोध लावला. तसेच टाईपसह छपाई यंत्राचा शोध देखील गुटेनबर्ग यांनी लावला. बायबल या ग्रंथाची छपाई करणारे देखील गुटेनबर्ग होते. इ.स. १४३४ ते १४३९ हा काळ मुद्रण क्षेत्रासाठी महत्त्वाचा काळ होता या काळातच गुटेनबर्गांनी 'धात्वलेखी मुद्रणाचा शोध लावला. उपकरणे म्हणून कागद, शाई आणि मुद्रण प्रतिमा हेच वापरण्यात येत होते. कोरीव मजकुरावर शाई लावून त्यावर ओलसर कागद ठेवून मुद्रणाचा ठसा उमटवायचे. या मुद्रणेच्या पद्धतीमध्ये खूप अडचणी आल्या. अक्षरे वाकडे दिसायचे. ह्यांचा मूळ व्यवसाय चांदीचा असून यांनी योहान फुष्ट ह्यांच्या समवेत मुद्रणाचा व्यवसाय सुरू केला.

इ.स.१४३४ ते १४३९ हा काळ मुद्रण क्षेत्रातील सर्वात महत्वाचा काळ होता. या काळात जर्मनीतील योहान गुटेनबर्ग यांनी धात्वलेखी मुद्रण नावाचा प्रकार शोधला होता. पण, हा प्रकार त्याआधी अस्तित्वात होता. असं म्हटलं जातं. मात्र, या संदर्भात कोणतेही पुरावे सापडलेले नाहीत. गुटेनबर्ग मुद्रा, मातृका आणि शिशाचा उपयोग करून ४० पानांचे बायबल छापले. गुटेनबर्ग हे जर्मनीत चांदीचे कारागीर होते. इ.स.१४५५ साली गुटेनबर्ग यांनी चल अक्षरांचा आणि मुद्रणाचा शोध लावला. त्यामुळे मुद्रण पद्धतीत लागणारा वेळ कमी झाला. भारतामध्ये मुद्रण कला १५५६ साली आली सर्वप्रथम गोव्यात पुर्तगालमधून छापखाना जहाजाने आला. महाराष्ट्रात ही कला १८८२ साली आली अमेरिकन मिशनने मुद्रणाची सुरुवात केली या साठी त्यांनी श्रीरामपुरातून देवनागरी लिपीचे खिळे आणले या मुद्रणालयात काम करणारे टॉमस ग्रॅहम मातृका तयार करण्यास शिकले त्यांनी देवनागरी आणि गुजरातीचे सांचे बनवून मातृका तयार केल्या. त्यांच्या कडून गणपत कृष्णाजी पाटील हे अमेरिकन मिशनचे होते मातृका बनविण्यास शिकले आणि स्वतःचे मुद्रणालय १८२७ रोजी सुरू केले. पाटीलांनी चुनखडा वरून समपृष्ठ छपाई केली आणि तंत्राची निर्मिती करून पंचांगाची छपाई केली. अक्षर मुद्रणालयदेखील त्यांनी सुरू केले. मिशनरींमुळे भारतात रुजलेल्या मुद्रणकलेचा टप्प्या टप्प्याने होत गेलेला विकास, मुद्रणकलेत झालेली सांस्कृतिक स्थित्यंतरे, अक्षरजुळणीत होत गेलेले बदल आणि वाङ्मयीन आणि साहित्याच्या प्रसारासाठी त्याचा झालेला वापर, असा मुद्रणकलेचा सांस्कृतिक इतिहास आता मराठीत उपलब्ध आहे. मुद्रणकलेचे अभ्यासक अ. का. प्रियोळकर यांनी १९५८ मध्ये लिहिलेल्या 'प्रिंटिंग प्रेस इन इंडिया' या इंग्रजी पुस्तकाचा मराठीत अनुवाद करण्यात आला असून, लवकरच मराठी संशोधन मंडळाच्या वतीने हे पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे. मुद्रण कलेचा विकास झाल्यावर संगणकावरून कमांड देऊन मुद्रण तंत्र विकसित झाले. त्यामुळे मुद्रण कमी वेळात पूर्ण होणे शक्य झाले. . कालांतरानंतर इंटरनेटचा विकास झाला आणि मीडिया विकसित झाला. त्यामुळे आपण सहजरित्या टाईप करू शकतो. (साभार : इंटरनेट)

# अभिनेत्री व चित्रपट निर्मात्या ललिता पवार

भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री ललिता पवार यांचा जन्म नाशिकजवळील येवला येथे झाला. त्यानंतर त्यांचे पुढील वास्तव्य इंदूर आणि पुणे येथे होते. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव अंबिका लक्ष्मण सगुण. त्यांचे वडील लक्ष्मण सगुण हे व्यापारी होते. ललिताबाईंचे शिक्षण प्राथमिक शाळेपर्यंत झाले. त्यानंतर त्यांनी मूकपटात बालकलाकार म्हणून काम करण्यास सुरुवात केली.

१९२८ साली आर्यमहिला या मूकपटात त्यांना भूमिका मिळाली. त्यानंतर गनिमी कावा (१९२८), जी.पी. पवारदिग्दर्शित ठकसेन राजपुत्र (१९२९), समशेर बहादूर (१९३०), चतुर सुंदरी (१९३०), पृथ्वीराज संयोगिता (१९३०), दिलेर जिगर (१९३१) इ. मूकपटांत त्यांनी विविध प्रकारच्या भूमिका केल्या. पुढे बोलपटांची सुरुवात झाल्यानंतर त्यांना बोलपटातही चांगली कामे मिळू लागली. मुंबईच्या चंद्र आर्ट्सच्या हिम्मते मर्दा (१९३५) या बोलपटात त्या नायिका होत्या. हाच त्यांचा मुख्य भूमिका असलेला पहिला बोलपट. हा चित्रपट खूप गाजला.

१९३८मध्ये टॉलस्टॉयच्या रेसरेक्शन या कादंबरीवरून दुनिया क्या है? (१९३८) या चित्रपटाची निर्मिती ललिताबाईंनी केली आणि त्यात भूमिकाही केली. त्यातील गाणी त्यांनी स्वतःच म्हटली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शन त्यांचे पती गणपतराव पवार यांनीच केले होते. भालजी पेंढारकरलिखित–दिग्दर्शित अरुण पिक्चर्सच्या नेताजी पालकर (१९३९) या चित्रपटात काशी या नायिकेची भूमिका त्यांनी प्रभावीपणे वठविली. हा त्यांचा पहिला मराठी बोलपट. एका चित्रपटाच्या चित्रिकरणादरम्यान अनवधनाने घडलेल्या अपघातामुळे त्यांना चेहऱ्याच्या पक्षाघाताचा आजार



झाला व या आजारपणात त्यांचा एक डोळा अधू झाला. परिणामी त्यांना चित्रपटांमध्ये नायिकेच्या भूमिका मिळणे बहुतांशी बंद झाले. पुढे त्यांनी चित्रपटांमध्ये चरित्र भूमिका साकारण्यास सुरुवात केली. त्यांच्या महत्त्वाच्या भूमिका असलेले मराठी चित्रपट म्हणजे अमृत (१९४२), गोरा कुंभार, जय मल्हार (१९४७), रामशास्त्री (१९४४), अमर भूपाळी (१९५१), मानाचं पान (१९५०), चोरीचा मामला (१९७६) हे होत. प्रभातच्या रामशास्त्री या चित्रपटात त्यांनी महत्त्वाकांक्षी, निष्ठूर आणि करारी स्वभावाच्या आनंदीबाईंची भूमिका केली होती.

ललिताबाईंनी संस्मरणीय भूमिका केलेल्या गाजलेल्या हिंदी चित्रपटांमध्ये पुढील चित्रपटांचा समावेश आहे. दहेज (१९५०), परछाई (१९५२), दाग, सुजाता (१९५९), श्री ४२०, अनाडी, जंगली, प्रोफेसर, घराना, खानदान, घर बसा के देखो, परवरिश, सास भी कभी बहू थी, बहूरानी व आनंद इत्यादी. दाग या चित्रपटात त्यांनी व्यसनी मुलाच्या प्रेमळ आईची भूमिका केलेली आहे, तर सुजाता या चित्रपटात त्यांनी रीतीरिवाजांना मानणाऱ्या कर्मठ स्त्रीची भूमिका केलेली आहे. अभिनयाच्या विविध छटा असलेल्या अशा अनेक व्यक्तिरेखा त्यांनी साकारल्या.

ललिताबाईंना अनाडी चित्रपटातील डिसा या भूमिकेकरिता फिल्मफेअरचा साहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला (१९६०). त्यांना १९६१ साली संगीत नाटक अकादमी पुरस्कार व १९७७ साली महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त झाला. गृहस्थी, सजनी, अनाडी, घर बसा के देखो या चित्रपटांतील उत्कृष्ट भूमिकांबद्दल त्यांना विविध पुरस्कार मिळाले. मूकपटापासून बोलपटापर्यंतच्या सु. सात दशकांच्या प्रदीर्घ कालखंडात चित्रपटसृष्टीत टिकून राहिलेल्या ललिता पवार चरित्रनायिका म्हणून विशेष लक्षात राहतात.

ललिताबाईंचा विवाह दिग्दर्शक गणपतराव पवार यांच्याशी झाला, पण हे विवाहबंधन फार काळ टिकले नाही. त्यांचा दुसरा विवाह निर्माते राजप्रकाश गुप्ता यांच्याशी झाला. आयुष्याच्या उत्तरार्धात ललिताबाईंना तोंडाचा कर्करोग झाला होता. यामुळे त्यांची प्रकृती खालावली. त्यातच त्यांचे पुणे येथे एकाकी अवस्थेत निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# तुमचा फोन हॅक झालाय? मग असे तपासून पाहा...

स्मार्टफोन असो वा लॅपटॉप हॅकिंगची समस्या जिकडेतिकडे आढळते. सेलिब्रेटी असो वा सर्वसामान्य सर्वांना याचा फटका बसला आहे. मोठे आर्थिक नुकसान आणि मनस्ताप सहन करावा लागला आहे.



मोठे आर्थिक नुकसान आणि मनस्ताप सहन करावा लागला आहे. असा हल्ला कधीही कुणाच्याही डिव्हाईसवर होऊ शकतो आणि क्षणात मोठे नुकसान होऊ शकते. हॅकिंगच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने सर्वांनी सावध राहण्याची गरज आहे. खबरदारी म्हणून काही बाबींचे पालन करणे गरजेचे आहे. फोनचे हॅकिंग झाले आहे की नाही, याची पडताळणी केली पाहिजे. याची खातरजमा पुढील मार्गांनी करता येते.

बॅटरी लाइफ कमी होणे – नेहमी बराच काळ चालणारी बॅटरी अचानक लवकर डिस्चार्ज होऊ लागते. फोन हॅक झाल्यास अनेक हेरगिरी करणाऱ्या प्स छुप्या पद्धतीने सुरु असतात. त्यासाठी बॅटरीचा वापर होत असतो. अशावेळी फोन तातडीने तज्ज्ञाला दाखवावा.

नको असलेलेॲप्स – अनेकदा तुम्हाला नको असलेल्या प्स फोनमध्ये डाऊनलोड होत असतात. तुमच्या परवानगीशिवाय त्या इन्स्टॉल झालेल्या असतात. यातून हॅकिंगचा प्रयत्न वा हेरगिरी होऊ शकते. डेटा वापर खूप वाढणे– तुमचा फोन ट्रॅक होत असल्याने अधिकचा डेटाचा वापर केला जात असतो. अशावेळी सतर्क झाले पाहिजे. डिव्हाइस खराब होणे

डिव्हाइस खराब होणे – फोन हॅक झाल्यास अचानक स्क्रीन फ्लॅशिंग होणे, फोन सेटिंग आपोआप बदलणे, फोन अचानक बंद पडणे असे प्रकार होऊ लागतात.


फोन गरम होणे – हेरगिरी ॲप तुमच्या डिव्हाइसचे लोकेशन ट्रॅक करीत असतात. त्यात जीपीएसचाही वापर होत असतो. यामुळे हार्डवेअरवर कमालीचा दबाव येत असतो व फोन प्रमाणाबाहेर तापत असतो.

ब्राउजिंग हिस्ट्री तपासणे – फोनची ब्राउजिंग हिस्ट्री नेहमी तपासावी. यामुळे ट्रॅकिंग करणारी किंवा हेरगिरी करणारी एखादी प्लिकेशन डाऊनलोड झाली आहे की काय, याची माहिती मिळू शकते. त्या वेबसाईटची माहितीही मिळते.

कॉलिंगवेळी सतत येणारे आवाज – काही हेरगिरी प कॉल रेकॉर्ड करीत असतात. कॉल केला असता बॅकग्राऊंडमध्ये सातत्याने आवाज येत असल्यास समजून घ्यावे की फोन हॅक झालेला आहे.

# प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ जे.पी. नाईक

प्रसिद्ध भारतीय शिक्षणतज्ज्ञ व पद्मभूषण पुरस्काराचे मानकरी. जे.पी. नाईक यांना भारतातील नवीन शैक्षणिक पद्धतीचे जनक आणि शिल्पकार म्हटले जाते. त्यांचा जन्म बहिरेवाडी (ता. आजरा, जि. कोल्हापूर) या दुर्गम खेड्यात झाला. त्यांचे मूळनाव विठ्ठल हरी घोटगे होय. त्यांच्यावर महात्मा गांधी यांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव होता. असहकार आंदोलनात भूमिगत असताना इंग्रजाना चकवा देण्याच्या हेतूने नाईक यांनी विठ्ठल हरी घोटगे हे नाव बदलून जयंत पांडूरंग नाईक म्हणजेच जे. पी. नाईक हे नाव धारण केले व याच नावाने ते जगभर प्रसिद्ध झाले.



## निमित्त

नाईक यांचे शालेय शिक्षण कानडी भाषेतून बेळगावीजवळील बेलहोंगल येथे, तर माध्यमिक शिक्षण बेळगावी येथे झाले. प्राथमिक शिक्षण घेताना कौटुंबिक दारिद्र्य व गरीबीमुळे त्यांना अनंत अडचणी आल्या. देशभक्तीने प्रेरित झालेल्या नाईक यांनी सरकारी नोकरी सोडून इंग्रजविरोधी असहकार आंदोलनात हिरीरीने सहभाग घेतला. त्या वेळी बेल्लारीच्या तुरुंगवासात त्यांनी इंग्रज अधिकाऱ्यांच्या मदतीने वैद्यकशास्त्र या विषयाचा अभ्यास करून तेथील रुग्णांची सेवा केली. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर गरीब जनतेसाठी त्यांनी स्वस्त औषधोपचाराचा दवाखाना काढून मोफत रुग्णसेवा केली. 'अनारोग्यामुळे दारिद्र्य आणि दारिद्र्यामुळे अनारोग्य या दुष्टचक्राचा भेद झाला पाहिजे', असे नाईक म्हणत. बालकांचे कुपोषण, बालमृत्युंचे प्रमाण व मातांच्या मृत्यूंचे प्रमाण यांमुळे ते अस्वस्थ होते. त्यांनी सर्वांसाठी 'कॉमन स्कूल' ही संकल्पना आपल्या विचारातून मांडली. प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे असले पाहिजे, असे ते म्हणत. स्वातंत्र्य, समता व बंधुता यांचा समावेश असलेली शिक्षणव्यवस्था त्यांना अभिप्रेत होती. भारत सरकारच्या शिक्षण खात्याद्वारा राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद त्यांनी स्थापन केली. नाईक यांनी भारत सरकार व युनेस्को यांच्या माध्यमातून १९६२मध्ये एशियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल प्लॅनिंग अँड डमिनिस्ट्रेशन ही संस्था दिल्ली येथे स्थापन करण्यात पुढाकार घेतला. आशिया खंडातील प्राथमिक शिक्षणाचा नियोजनबद्ध विकास करण्यामध्ये ही संस्था मोलाची ठरली. नाईक यांनी प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, हस्तपुस्तिका, सेवापूर्व व सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षणासाठी साहित्य निर्मिती केली. नाईक यांचे कार्य पाहून युनेस्कोने त्यांना आपले विचार मांडण्यासाठी १९५२मध्ये निमंत्रित केले. नाईक यांचे भारतीय व जागतिक शिक्षण क्षेत्रातील योगदान अतिशय मौलिक स्वरूपाचे आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांना पद्मभूषण (१९७४) हा सन्मान बहाल केला. अखबारनवीस हे मानाचे पारितोषिक त्यांना मिळाले. त्यांच्या नावे शासनाने पोस्ट तिकीट काढले, भारतीयांना अभिमान वाटण्यासारखी बाब म्हणजे युनेस्कोच्या २,५०० वर्षांतील १०० निवडक जागतिक शैक्षणिक विचारवंतांच्या 'थिंकर्स ऑन एज्युकेशन' या अहवालात भारतातील महात्मा गांधी व रविंद्रनाथ टागोर यांच्यासोबत नाईक यांचा समावेश आहे. नाईक यांचे २४ फेब्रुवारी २०११मध्ये पुणे येथे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर



# तुमचे तळपाय सांगतात आरोग्याचे रहस्य

डोळ्यांपासून ते पायांपर्यंत शरीराचा प्रत्येक अवयव खूप महत्त्वाचा असतो. तसेच तुमचे तळपाय तुमच्या आरोग्याबद्दल बरेच काही सांगू शकतात आणि त्वरित लक्ष देण्याची आवश्यकता असलेल्या आरोग्य समस्यांकडे संकेत देऊ शकतात.

यावर सविस्तरपणे बोलताना, आहारतज्ज्ञ निधी गुप्ता यांनी इन्स्टाग्रामवर सामान्य आरोग्य समस्या शेअर केल्या, ज्याची पहिली लक्षणे पायांवर दिसतात असे त्यांचे मत होते. याच्याशी सहमती दर्शवत, परळ, मुंबई येथील ग्लेनेगल्स हॉस्पिटलचे ऑर्थोपेडिक्सचे वरिष्ठ सल्लागार डॉ. अनुप खत्री म्हणाले की, या समस्येमागील मूळ कारणांचे मूल्यांकन करणे आणि नंतर वेळेवर उपचार सुरू करणे ही काळाची गरज आहे. आहाराकडे लक्ष देणे आणि डॉक्टरांनी दिलेल्या उपचार मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे, असे डॉ. खत्री म्हणाले.काही सामान्य संकेत असे आहेत

सूज : पायांना सूज येणे हे मूत्रपिंडाचे कार्य कमी असणे, हृदयरोग, यकृताचे आजार किंवा गर्भधारणा दर्शवू शकते. संधिवात आणि व्हिटॅमिन–डीच्या कमतरतेमुळे घोट्यात वेदना होऊ शकतात, असे डॉ. अनुप खत्री म्हणाले.

स्पायडर व्हेन्स : हे बहुतेकदा उच्च इस्ट्रोजेन पातळी, गर्भनिरोधक गोळ्या किंवा गर्भधारणेशी जोडलेले असते. जर तुम्हीही हे अनुभवत असाल तर तुमच्या डॉक्टरांशी चर्चा करणे गरजेचे आहे, असे गुप्ता म्हणाल्या.

पायांना भेगा : व्हिटॅमिन बी २ (रिबोफ्लेविन), बी ३ (नियासीनामाइड) आणि ओमेगा–३ च्या कमतरतेचे हे एक सामान्य लक्षण आहे. पूरक आहाराद्वारे या व्हिटॅमिनचे पुरेसे सेवन केल्याने त्वचेचे आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकते, असे गुप्ता म्हणाल्या.

डॉ. खत्री म्हणाले की, व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता मज्ज्ञातंतूंशी संबंधित अस्वस्थता आणि मुंग्या येणे याद्वारे निर्माण होऊ शकते. तसेच फॅटी ॲसिडचे, विशेषतः ओमेगा–३ चे अपुरे सेवन हे निरोगी फॅट्स त्वचेची लवचिकता आणि हायड्रेशन राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

# रायगडात २४० ग्रामपंचायतींवर आता सरपंचच प्रशासक

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हयातील मुदत संपलेल्या २४० ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून आता सरपंचच विराजमान होणार आहेत. त्यामुळे गावची सारी सुत्रे त्यांच्या हातात जाणार आहेत. महायुती सरकारने सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा मोठा फायदा महायुतीतील घटक पक्षांना होणार आहे. सरकारी निधीचे मर्जीनुसार वाटपही सरपंचांच्या माध्यमातून केले जाणार आहे.

रायगड जिल्हयातील २४० ग्रामपंचायतींची मुदत संपून सुमारे दीड ते दोन वर्षे झाली आहेत. गेल्या दीड-दोन वर्षांत ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होऊ शकलेल्या नाही. यामध्ये अलिबाग तालुक्यातील ३४, मुरूड तालुक्यातील ४, पेण १८, पनवेल १५, उरण ४, कर्जत ३०, खालापूर ३, रोहा २६, सुधागड ६, माणगाव २१, तळा १८, महाड ३०, श्रीवर्धन १६ व म्हसळा ११ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. अलिबाग तालुक्यातील चेंढरे, वरसोली, थळ, मापगांव, सातिर्जे, आगरसुरे, झिराड, धोकवडे, सारळ, रांजणखार डावली, रेवस, परहूर, चरी, कुरकुंडी कोलटेंभी, शहापूर, आंबेपूर, पोयनाड, श्रीगाव, कुसूंबळे, कुर्डूस, ताडवागळे, कुरुळ, बेलकडे, ढवर, कावीर, सहाण, बामणगाव, बेलोशी, चिंचोटी, बोरघर, रामराज, सुडकोली, वरंडे, चौल या ३४ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.




नुकत्याच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. त्यामुळे या निवडणुका पार पडल्यानंतर राज्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुका होतील असे सांगितले जात होते, त्यामुळे नुकतेच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या रणधुमाळीमधून बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांनी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी तयारी सुरु केली होती. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग ग्रामपंचायत निवडणुकांच्या कार्यक्रम कधी जाहीर करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

मात्र राज्य शासनाने राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकांबाबत नुकतीच एक अधिसूचना जाहीर केली आहे. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अथवा महिन्याअखेरीस मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर थेट ग्रामपंचायतचे सरपंच हेच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याची अधिसूचना ग्रामविकास विभागाने काढली आहे. राज्यात फेब्रुवारी २०२६ अखेरपर्यंत १४ हजार २३४ ग्रामपंचायतीची मुदत संपत आहे. यापूर्वी ग्रामपंचायतीची मुदत संपल्यावर पुढील निवडणूक होईपर्यंत संबंधित अधिकारी हा प्रशासक म्हणून काम पाहत होता. पण ग्रामविकास विभागाने पहिल्यांदाच वेगळा प्रयोग राबवला आहे. पुढील निवडणुका होईपर्यंत म्हणजे सहा महिन्यांपर्यंत सरपंच हेच प्रशासक असतील.

विद्यमान उपसरपंच अथवा ग्रामपंचायत सदस्य यांची प्रशासकीय समिती नेमण्यात येईल. याविषयीचा अधिकार हे जिल्हा परिषदेकडे दिले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याविषयीचा निर्णय घेतील. राज्यातील ग्रामपंचायतींची मोठी संख्या आणि विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता प्रशासनासमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे सरकारने सुधारित निर्णय घेतला आहे.

नव्या निर्णयानुसार, ग्रामपंचायतीची मुदत संपण्याच्या दिवसापर्यंत जे सरपंच पदावर असतील, त्यांनाच प्रशासक म्हणून नेमण्यात येईल. त्यांच्या मदतीसाठी विद्यमान उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती स्थापन केली जाणार आहे. यामुळे स्थानिक पातळीवर निर्णय प्रक्रिया सुरळीत राहण्यास मदत होईल आणि नव्या व्यक्तींना प्रशासन समजून घेण्यासाठी लागणारा वेळ वाचेल.

राज्यातील ग्रामपंचायतींची मोठी संख्या आणि विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता प्रशासनासमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे सरकारने सुधारित निर्णय घेतला आहे. प्रशासक आणि प्रशासकीय समितीचा कालावधी त्यांच्या नेमणुकीपासून सहा महिने राहणार आहे. पावसाळ्या नंतर दिवाळीच्या सुमारास या ग्रामपंचयातींच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे.

### सर्वाधिक ग्रामपंचायती अलिबाग तालुक्यात

अलिबाग तालुक्यातील ३४, मुरूड तालुक्यातील ४, पेण तालुक्यातील १८, पनवेल तालुक्यातील १५, उरण तालुक्यातील ४, कर्जत तालुक्यातील ३०, खालापूर तालुक्यातील ३, रोहा तालुक्यातील २६, सुधागड तालुक्यातील ६, माणगाव तालुक्यातील २१, तळा तालुक्यातील १८, महाड तालुक्यातील ३०, श्रीवर्धन तालुक्यातील १६ व म्हसळा तालुक्यातील ११ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

## जि.प. कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



**अलिबाग : प्रतिनिधी**

विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. या मोर्चात मोठ्या संखेनी कर्मचारी सहभागी झाले होते. शासनाने जर मागण्यांकडे दुर्लक्ष केले तर बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येईल,असा इशारा देण्यात आला आहे.

जय महाराष्ट्र शसकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. जिल्हा परिषदेच्या कुंटे बाग येथील संकुलातून मोर्चाला सुरुवात झाली. पोलीस अधीक्षक कार्यालय, स्टेट बँक ऑफ इंडीया मार्गे पुन्हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दाखल झाला. जुनी पेंशन योजना लागू करा या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. मोर्चात सहभागी झालेले कर्मचारी यावेळी आक्रमक झाले होते.

जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना रायगड शाखेचे जिल्हा पालक अध्यक्ष सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. जिल्हा अध्यक्ष मंगेश ठाकूर, कार्याध्यक्ष प्रमोद पाटील, खजिनदार अमोल म्हात्रे, सचिव प्रशांत जुईकर, जिल्हा उपाध्यक्ष सौ. संजीवनी घरत आदी यावेळी उपस्थित होते.

लिपीक संवर्गाच्या चौथ्या वेतन आयोगापासून वेतनश्रेणीत असलेली तफावत दूर करून सुधारीत वेतन श्रेणी लागू करा. पदनामात बदल करा. पदोन्नतीची साखळी कमी करा. जशाच तशी जुनी पेन्शन लागू करा. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपाच्या प्रतिक्षासुचीवर असलेल्या सर्वांना जूनी पेन्शन लागू करा यासारख्या मागण्या यावेळी करण्यात आल्या.

## रिसॉर्टमध्ये शेफला मारहाण; गुन्हा दाखल

**खालापूर : प्रतिनिधी**




वाढदिवसाची पार्टी सोडून रूमवर गेल्याचा राग मनात धरून धर्मेंद्र दर्या आणि जगदीश सिंग यांनी शेफ प्रकाश गगन लामा रा. नेपाळ याला काचेचा ग्लास फेकुन मारल्याने डोळयावर लागुन दुखापत झाल्याची घटना शनिवारी रात्री विणेगाव फन रिसॉर्टमध्ये घडली.

फन रिसॉर्टचे व्यवस्थापक सिसिदकुमार पात्रा यांच्या वाढदिवसाची पार्टी सुरू असताना लामा रुमवर परत गेला याचा राग धर्मेंद्र आणि जगदीशला आला. या रागात लामाला मारहाण करण्यात आली. याबाबत जखमी प्रकाश लामा याने खालापूर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली असून त्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार मनोहर पाटील हे करीत आहेत.

## पेणमधील पाटणेश्वर येथे घरफोडी; दीड लाख रुपये चोरीस

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील श्री क्षेत्र पाटणेश्वर येथील दिनेश मनिराम म्हात्रे व विनायक म्हात्रे यांच्या घरी रविवारी रात्री चोरी झाली असून या बाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी दिनेश मनिराम म्हात्रे यांचा छोटा भाऊ विनायक मनिराम म्हात्रे हे बंगळूर येथे कामानिमित्त कुटुंबा समवेत राहत असतात त्यामुळे त्यांच्या घरी लॉक लावलेला असतो मात्र विनायक यांची आई सुरेखा म्हात्रे या रोज



सकाळ संध्याकाळ घरात दिवाबत्ती करून पाटणोली येथील राहत्या घरी परत जातात. रोजच्या प्रमाणे कालही सायंकाळी ७.०० च्या सुमारास दिवाबत्ती करून घरी गेल्या.

आज सकाळी घरी आल्या असता त्यांना घराची कडी तोडलेल्या अवस्थेत आढळला तर लॉक हा तुळशी वृंदावनाच्या जवळ टाकलेला दिसला, घरातील दोन कपाट फोडून सामान अस्ताव्यस्त असल्याचे चित्र दिसून आले.

यावेळी त्यांनी पेण पोलीस ठाण्यात घरफोडी झाल्याचे कळविले. पेण पोलीस ठाण्याचे गुन्हा प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. तसेच पोलीस निरिक्षक संदिप बागूल यांनी ही घटनास्थळाची पाहणी करून तातडीने फॉरेनसीक टिमला प्राचारण केले आहे.

## भोई सामाजिक सभागृहाचे लोकार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील दहिवली विभागातील भोई आली मध्ये भोई समाज बांधवांसाठी सामाजिक सभागृह उभारण्यात आले आहे. या सभागृहाचा लोकार्पण सोहळा करण्यात आला. सदर सभागृहाचे नामकरण 'भोईराज भवन' असे करण्यात आले आहे.

दहिवली येथील इंदिरानगर मधील भोई आळी मध्ये उभारण्यात आलेल्या सभागृहाच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सभागृहाचे उदघाट्न रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी नगराध्यक्ष पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे, युवक तालुकाध्यक्ष ॲड. स्वप्नील पालकर, नगरसेवक महेंद्र चंदन, राजाभाऊ कोठारी, प्रशांत पाटील, कुमेश मोरे, सुचिता खोत, स्नेहा शिंदे, सुमिता गायकवाड, माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव, उमेश गायकवाड, मिलिंद चिखलकर, भीमसेन बडेकर, लहू श्रीखंडे, नंदू लाड, लक्ष्मीकांत लाड व सामाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**

पिन कोड-४०२ २०१

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com

दुरध्वनी / फॅक्स क्रमांक :- (०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई-निविदा सूचना क्र. ३१ सन २०२५-२०२६**

**(प्रथम निविदा/दुबार निविदा)**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १. | सुधागड येथील आय. टी. आय. इमारतीसाठी टेरेस शेडचे बांधकाम. ता. पेण. जिल्हा : रायगड **(प्रथम निविदा)** | ५५,४४,१२६/- |
| २. | जिल्हा न्यायालय येथील नवीन न्यायालय (Four Bar Court) इमारतीचे विस्तारीकरण करणे ता. अलिबाग जि. रायगड **(दुबार निविदा)** | ७४,२०,२१४/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २४.०२.२०२६ (स.१०.००) ते दिनांक ३.०३.२०२६ (सं.१८.००)

ई-निविदा उघडणे कालावधी : दिनांक ०६.०३.२०२६ (दु. ३.०० वा.) (कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर. निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/७८५/२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग - ४०२ २०१
दिनांक : १८/०२/२०२६

**सही/-**
**(एम.एम. धायतडक)**
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग, अलिबाग,
जि. रायगड

आरओसी - २०२५-२६/क्र.-५/सी ६०९७



**पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी. करंजा**

(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)

पता -नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र-४००७०४

**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**

An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India

Address : Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad Maharashtra-**400704**

| | | |
|---|---|---|
| दूरभाष/फॅक्स-022-27222132, | ई-मेल/E-Mail : kvkaranja@gmail.com | KV CODE : 1205 |
| CBSE Affiliation.1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE : 27241501112 |

वैबसाइट - https://nadkaranja.kvs.ac.in ईमेल: kvkaranja@gmail.com

**साक्षात्कार सूचना / Walk-In Interview**

पीएम श्री केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शैक्षिक वर्ष 2026-27 हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शैक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है -

| पद का नाम | न्यूनतम योग्यता | साक्षात्कार दिवस |
|---|---|---|
| स्नातकोत्तर शिक्षक (Post Graduate Teachers) **(अंग्रेजी ,हिन्दी, भौतिकी, रसायन, गणित , जीवविज्ञान, संगणक, वाणिज्य अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, राजनीति शास्त्र)** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी/एम. कॉम.) एवं बी.एड डिग्री | **02-03-2026 (सोमवार)** |
| प्रशिक्षित स्नातक शिक्षक (Trained Graduate Teacher) **(अंग्रेजी, हिन्दी, संस्कृत, गणित, विज्ञान, सामाजिक अध्ययन)** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातक डिग्री (बी.ए/बी.एस.सी) एवं बी.एड डिग्री) और सी.टी.ई.टी. | |
| प्राथमिक शिक्षक (PRT) | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से सम्बंधित विषय में ५०% अंकों के साथ १२वीं पास एवं डी.एड. डिग्री और सी.टी.ई.टी | |
| **पूर्व प्राथमिक शिक्षक (बालवाटिका-३)** Pre-PrimaryTeacher (Balvatika-3) | १. किसी मान्यता प्राप्त बोर्ड से सीनियर सेकेंडरी कक्षा (बारहवीं) या इसके समकक्ष कम से कम ५०% अंकों के साथ। २. नर्सरी शिक्षक शिक्षा/प्री-स्कूलशिक्षा/प्रारंभिक शिक्षा कार्यक्रम (डी.ई.सी.एड) में डिप्लोमा, जिसकी अवधि दो वर्ष से कम न हो या बी.एड.(नर्सरी) एनसीटीई से मान्यता प्राप्त संस्थान से हो । ३. वांछनीय: अंग्रेजी, हिंदी और मराठी में शिक्षण दक्षता। | **04-03-2026 (बुधवार)** |
| **प्रशिक्षक : मराठी शिक्षक, कंप्यूटर प्रशिक्षक (प्राथमिक & माध्यमिक), कलाशिक्षा, संगीत, नृत्य, खेलप्रशिक्षक, योग प्रशिक्षक कौशल, शिक्षक,विशेष शिक्षक, एटीएल प्रशिक्षक,काउंसलर, स्टाफ नर्स.** Marathi Teacher, Computer Instructor (Primary & Secondary), Art Education, Music,Dance, Sports. Yoga, Skill Educator, Special Educator, ATL Lab Instructor, Counselor, Staff Nurse. | सम्बंधित विषय में डिग्री / डिप्लोमा | |

**पंजीकरण समय :** 8:00 AM TO 10:00 AM

**नोट :** अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ आधार कार्ड (Original) तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**Application form QR Code**

**सही/-**
**प्राचार्य**
**पीएम श्री केवि एन.ए.डी. करंजा**
**प्राचार्य/Principal**
**पीएम श्री केंन्द्रीय विद्यालय/ PM SHRI Kendriya Vidyalaya**
**एन.ए.डी. करंजा / NAD Karanja**
**उरण जिला-रायगढ (महाराष्ट्र)/ Uran-Dist-Raigad (MH)**



**पनवेल महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण विभाग**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिका, महिला व बालकल्याण विभागामार्फत **जागतिक महिला दिनानिमित्त** विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमामध्ये **पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध क्षेत्रांत उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांचा गौरव** करण्यात येणार आहे.

त्यानुषंगाने, पनवेल महानगरपालिका हद्दीत वास्तव्य असलेल्या आणि कार्यरत असलेल्या **शिक्षण, समाजसेवा, आरोग्य, क्रीडा, कला, उद्योग, प्रशासन, पर्यावरण, महिला सक्षमीकरण व इतर कोणत्याही क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांची माहिती** मागविण्यात येत आहे.

उत्कृष्ट कामगिरी केलेल्या महिलेची माहिती महानगरपालिकेने नमूद केलेल्या विहित नमुन्यात महिला व बालकल्याण विभागाकडे दि. २६/०२/२०२६ पर्यंत सादर करावी. प्राप्त अर्जांमधून निवड करण्याचा अंतिम अधिकार निवड समिती सदस्यांना राहील. सदर नमुना व सविस्तर माहिती www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दिनांक : २३/०२/२०२६
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६ /प्र.क्र.३८/४४/२०२६

**सही/-**
महेशकुमार मेघमाळे
**अतिरिक्त आयुक्त**
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि आमचे अशिलांनी **१. श्री. विनय गणेश गोसावी, २. श्री. समाधान गजानन ठाकूर, ३. श्री. प्रकाश हिराजी घरत** खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीचे जमीन मालक (कब्जेदार) **१. श्री. अजित विठोबा पाटील, २. श्रीमती. चंद्रभागा विठोबा पाटील, ३. श्रीमती. किर्ती विठोबा पाटील, ४. श्री. जितेश विठोबा पाटील, ५. श्री. विजय विठोबा पाटील** यांच्याकडून खरेदी घेणेचे निश्चित झाले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे कोपर, ता. पेण, जिल्हा. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| ३७ | ४ | ०-२४-२० पो.ख. ०-०४-६० **एकूण ०-२८-८०** | २.६२ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लीज, तबदील, ट्रस्ट, वारस या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे मुदतीत खालील सही करणारे यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृ तदर्शनी लेखी पुराव्यासहित रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही तर सदर मिळकत हि निर्वेध बोजारहित व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल व पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यांत येईल. हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण - पनवेल
दि.२३/०२/२०२६

**सही/-**
**(ॲड. जितेन्द्र इनामदार)**

गाळा नं. ११८, म्युनसिपल, शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेराक्सजवळ, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६
फोन नं. ७७९८९४१७०४

# वेश्या व्यवसायातून दोघींची सुटका

## आरोपीला नवी मुंबई गुन्हे शाखेकडून अटक

**पनवेल : वार्ताहर, कळंबोली : बातमीदार**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत गुन्हे शाखेने सेक्टर ११ परिसरात सापळा रचत कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून आरोपीला बोलावून छापा टाकला. या कारवाईत हरिष विकास छारी. (वय २५, रा. कोपरखैरणे) याला अटक करण्यात आली. आरोपी अल्पवयीन मुलींना ग्राहकांना पुरवत असल्याची माहिती समोर आली आहे.




दोन पीडित मुलींची सुटका करण्यात आली असून त्या अनुक्रमे १६ व १४ वर्षांच्या असल्याचे समजते. या प्रकरणी सीबीडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता, अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ तसेच POCSO कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे. अल्पवयीन मुलींना अशा गुन्हेगारी जाळ्यात ओढणाऱ्यांविरुद्ध कायद्याने अत्यंत कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संपूर्ण रॅकेट उघड करणे आणि अशा प्रकारांना कायमस्वरूपी आळा बसवणे गरजेचे आहे.

समाजानेही सतर्क राहून संशयास्पद हालचालींची माहिती त्वरित पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. गुन्हे शाखेची ही कारवाई कौतुकास्पद असली तरी या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.



## नवी मुंबई महानगरपालिकेच्या १० नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५(२)(ब) अन्वये नवी मुंबई महानगरपालिकेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेप्रसंगी आज पिठासन अधिकारी महापौर सुजाता पाटील यांनी नामनिर्देशनाद्वारे १० नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक रण्यात आल्याचे जाहीर केले.

या १० नामनिर्देशित सदस्यांमध्ये कुलदिप सुरी, भरत नखाते, जगजीवन केणी, अपर्णा गवते, अमित मेढकर, लक्ष्मीकांत पाटील, व्दारकानाथ भोईर, साहिल चौगुले, सुरेश भिलारे, अंकुश कदम यांची नेमणूक करण्यात येत असल्याचे जाहीर केले.

नियुक्त नामनिर्देशित सदस्यांचे महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत व महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पुष्पगुच्छ देवुन अभिनंदन केले.

## रोटरी क्लब ऑफ मिलेनियम सिटीतर्फे नॅशनल बिल्डर अवॉर्ड

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ मिलेनियम सिटी, नवी मुंबई यांनी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी भारतीय विद्या भवन, वाशी, नवी मुंबई येथे नॅशनल बिल्डर अवॉर्ड २०२६ चे यशस्वी आयोजन केले. आदिवासी व ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमाला ५४ मान्यवरांची उपस्थिती लाभली. शिक्षकांचा गौरव करण्यासाठी हा विशेष उपक्रम होता. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण म्हणजे आदरणीय क्लब सदस्य सेंगुप्ता सर यांचे राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) विषयावरील मार्गदर्शनपर भाषण.

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून त्यांनी NEPच्या दृष्टीकोन, परिवर्तनशील भूमिका आणि शिक्षक व विद्यार्थ्यांवरील दीर्घकालीन परिणाम याबाबत सखोल विचार मांडले. त्यांच्या स्पष्ट विचारसरणीने व शिक्षणाबद्दलच्या समर्पणाने उपस्थितांना राष्ट्रनिर्मितीतील आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करण्यास प्रेरित केले. सिंगापुरीजी सर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे अत्यंत सुरेख व शिस्तबद्ध सूत्रसंचालन केले, ज्यामुळे कार्यक्रम सुरळीत झाला. पवन सर यांनी प्रमुख पाहुण्यांची प्रभावी ओळख करून दिली व मनःपूर्वक आभार मानले. युवराज सर यांनी पडद्यामागील सततच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी होण्यास मोठी मदत केली. तसेच क्लबद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांना दीर्घकालीन पाठिंबा दिल्याबद्दल अविनाश म्हात्रे यांच्या योगदानाचे विशेष कौतुक करण्यात आले.

या समारंभात प्राजक्ता आनंद पाटील, मीरा वसंत पाटील, आशा सुनील जाधव, गणेश पांडुरंग पाटील, गणेश तानाजी पवार, विजया संतोष शिद, अजय पांडुरंग पाटील, राजेंद्र बाबुराव म्हात्रे, मनीषा मनोहर वेले, रविंद्र दत्तात्रय म्हात्रे या शिक्षकांना त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी व्यावसायिक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## अश्लील व्हिडीओ केला व्हायरल; तरुणावर गुन्हा

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यात कोप्रोली येथे राहणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणाने प्रेयसीचे अश्लील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. उरण तालुक्यात कोप्रोली येथे राहणाऱ्या शिवम जाधव (वय २१) असे या तरुणाचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

आरोपी शिवम हा उरणच्या कोप्रोली भागात राहण्यास आहे. तर, २१ वर्षीय पीडित तरुणी पनवेल येथे राहण्यास आहे. दोन वर्षांपूर्वी इन्स्टाग्रामद्वारे या दोघांची ओळख झाली होती. या ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाल्यानंतर शिवमने तरुणीशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यावेळी तरुणीच्या नकळत मोबाईलमध्ये या खासगी क्षणांचे व्हिडिओ चित्रीकरण केले होते. दरम्यानच्या काळात काही कारणामुळे वर्षभरापूर्वी या दोघांमधील प्रेमसंबंध तुटले. त्यानंतर पीडित तरुणीने दुसऱ्या तरुणाशी लग्न केले. ही बाब शिवम याला समजल्यानंतर त्याने दोघांमधील शरीरसंबंधाचे खासगी व्हिडिओ १६ फेब्रुवारी रोजी सोशल मीडियावर व्हायरल केले. तसेच पीडित तरुणीच्या परिचयातील तरुणाला व्हॉट्सऍप वर पाठवून दिले. शिवमने खासगी व्हिडिओ व्हायरल केल्याचे लक्षात आल्यानंतर पीडितेने पनवेल शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## नवी मुंबई विमानतळावर डिजियात्रा प्रणालीचा शुभारंभ




### ई-गेटद्वारे प्रवेश प्रक्रिया

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर डिजियात्रा प्रणालीची सुरुवात करण्यात आली असून, देशव्यापी विस्तार मोहिमेचा भाग म्हणून या सुविधेचा समावेश करण्यात आला आहे. शुक्रवारी झालेल्या राष्ट्रीय कार्यक्रमानिमित्त विमानतळाच्या टर्मिनलमध्ये उद्घाटन सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी तीन प्रवाशांनी बायोमेट्रिक ई-गेटमधून प्रवेश करून प्रणालीची प्रतीकात्मक सुरुवात केली.

देशातील काही प्रमुख विमानतळांवर ही सुविधा आधीपासून कार्यरत आहे. त्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई विमानतळाचाही या प्रणालीत समावेश करण्यात आला आहे. सध्या विमानतळावरील नियमित व्यावसायिक उड्डाणे पूर्ण क्षमतेने सुरू झालेली नसली, तरी प्रवासी वाहतूक वाढल्यानंतर या प्रणालीचा व्यापक वापर अपेक्षित आहे. प्रत्यक्ष प्रवासी संख्येत वाढ झाल्यानंतरच तिची गती, अचूकता आणि व्यवहार्यता स्पष्ट होणार आहे.

डिजिटल ओळखीवर आधारित प्रणाली असल्याने माहिती सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक तांत्रिक उपाययोजना आणि गोपनीयतेचे निकष पाळले जात असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, प्रवाशांचा अनुभव आणि प्रणालीतील तांत्रिक सुसूत्रता यावरच या उपक्रमाचे यश अवलंबून राहील.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा अदानी एअरपोर्ट होल्डिंग लिमिटेड समूहाच्या ताफ्यातील ग्रीनफिल्ड प्रकल्प आहे. या समूहाकडे मुंबई विमानतळासह देशातील अन्य विमानतळांचे संचालन आहे. विमानतळ प्रक्रियेचे डिजिटलकरण करण्याच्या व्यापक धोरणात 'डिजीयात्रा'ला महत्त्वाचा टप्पा मानले जात आहे.

### काय आहे डिजियात्रा प्रणाली?

'डिजीयात्रा' ही प्रवाशांच्या डिजिटल ओळखीवर आधारित व्यवस्था आहे. प्रवाशांनी आगाऊ नोंदणी केल्यानंतर त्यांची माहिती प्रणालीशी जोडली जाते. विमानतळावर प्रवेश करताना ई-गेटसमोर उभे राहिल्यावर चेहऱ्याच्या आधारे ओळख पडताळली जाते आणि पडताळणी यशस्वी झाल्यास प्रवेश दिला जातो. त्यामुळे बोर्डिंग पास आणि ओळखपत्र वारंवार तपासण्याची आवश्यकता कमी होते. प्रवेशद्वार, सुरक्षा तपासणी आणि बोर्डिंगपूर्व टप्पे अधिक जलद पार पडावेत, हा या व्यवस्थेमागील उद्देश आहे.

## तुर्भे येथे नशाविरोधी जनजागृती शिबिर



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस शालेय परिसरात तसेच आजूबाजूच्या भागात अमली पदार्थ, गुटखा, तंबाखू, सिगारेट, व्हेप यांचे वाढते प्रमाण चिंताजनक ठरत आहे. त्याचा युवा पिढीवर होणारा परिणाम समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे. या पार्श्वभूमीवर नवजीवन हिन्दी विद्यालय येथे सुमारे २०० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत २० फेब्रुवारी रोजी नशाविरोधी जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये डॉ.रविंद्र गोसावी यांनी विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा, सिगारेट व इतर नशायुक्त पदार्थांच्या सेवनामुळे शरीरावर होणारे गंभीर दुष्परिणाम यावर मार्गदर्शन केले. गुटखा व तंबाखू सेवनामुळे तोंडाचा कर्करोग, जबडा न उघडणे, दातांचे विकार, दात पिवळे पडणे, तोंडाला दुर्गंधी येणे यांसारख्या समस्या उद्भवतात. सिगारेटमुळे फुफ्फुसांचे विकार, हृदयरोग, स्ट्रोक, नपुंसकत्व तसेच विविध प्रकारचे कर्करोग होण्याचा धोका वाढतो.

तसेच सतत एनर्जी ड्रिंकचे सेवन, फास्ट फूड व जंक फूड यांमुळे लठ्ठपणा, मधुमेह, रक्तदाब वाढणे अशा समस्या निर्माण होतात. मुलींमध्ये पीसीओडी व मासिक पाळीतील अनियमितता यांसारख्या समस्या वाढण्याची शक्यता असून या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिराच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी एका सुरात मी कोणत्याही प्रकारची नशा करणार नाही आणि इतरांनाही नशेपासून दूर राहण्यास प्रवृत्त करेन, अशी सामूहिक शपथ घेतली. माणसाचे मन व शरीर आपल्या सवयींचे गुलाम असते. त्यामुळे चुकीच्या सवयींकडे दुर्लक्ष करू नका. आजची सवय उद्याचा आजार ठरू शकते असा प्रेरणादायी संदेश डॉ रविंद्र गोसावी सरांनी विद्यार्थ्यांसाठी दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक जागरूकता निर्माण झाली असून शाळा प्रशासनाने या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक केले.

या शिबिरासाठी नवजीवन हिंदी विद्यालयाचे मुख्याध्यापक अजीम सर, मनोज सर अश्फाक सर, चंद्रकांत भोसले, गजानन इंगळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## वाशी खाडी पुलावरून उडी मारणाऱ्याला वाचवण्यात यश

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील इस्मानी वाशी ब्रिजवरून एका अज्ञात व्यक्तीने खाडीमध्ये उडी मारल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच लोकेश्वरी बोट व प्रभुवचन बोट या दोन्ही बचाव पथकाच्या बोटी तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आल्या.

दोन्ही बोटी वाशी खाडी पुलाखाली जाऊन आजूबाजूच्या परिसरात शोधकार्य राबवण्यात आले. शोधादरम्यान हा व्यक्ती पाण्यात आढळून आला. तत्काळ त्याला लोकेश्वरी व प्रभुवचन बोटींच्या मदतीने सुखरूप पाण्याबाहेर काढण्यात आले.

यानंतर संबंधित व्यक्तीस पुढील वैद्यकीय तपासणी व आवश्यक कार्यवाहीसाठी वाशी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. वेळेवर केलेल्या बचावकार्यामुळे मोठी दुर्घटना टळली असून बचाव पथकाच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.






**कामोठे : हिंद दी चादर उपक्रमांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या कामोठे येथील नागरी आरोग्य केंद्र क्र.१४मध्ये आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे माजी आरोग्य सभापती डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. संकेत पोवार, डॉ.शुभम आंब्रे, रमा बुक्तरे, वैष्णवी दिसले, प्रियंका चव्हाण, मोनिका धिंडा, नीलिमा आत्राम, साहील पठान, दिनेश कोनकर, पूनम कदम, स्वाती भगत, आशा स्वयंसेविका सुवर्णा खडसे आदी उपस्थित होते.**

## अमृत महोत्सवाचा सोहळा

आज आपण एका युगाचा गौरव सोहळा अनुभवतोय!
पंच्याहत्तर वर्षांचा हा प्रवास म्हणजे
साधा काळाचा आकडा नाही
हे आहे संघर्षाचे सुवर्णशिखर!
हा आहे कर्तृत्वाचा अमृतकलश!

ज्यांनी आयुष्याला फक्त वर्षांनी मोजलं नाही
तर कार्याने अमर केलं
असं ते व्यक्तिमत्त्व म्हणजे
लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब!

त्यांच्या विचारात दूरदृष्टी आहे
निर्णयात धाडस आहे
आणि हृदयात समाजासाठी अखंड धग आहे!
रायगडच्या मातीत त्यांनी स्वप्नांची बीजं रोवली
आणि आज त्या बिजांचा वटवृक्ष झालाय!

हजारो कुटुंबांचा आधार
लाखो विद्यार्थ्यांचा प्रेरणास्त्रोत
आणि असंख्य कार्यकर्त्यांच्या हृदयातील श्रद्धास्थान!
रामशेठ ठाकूर हे नाव नाही
ती एक चळवळ आहे!
ती एक दिशा आहे!
ती एक विकासाची गाथा आहे!

त्यांचा प्रत्येक श्वास समाजासाठी
प्रत्येक निर्णय जनतेसाठी
आणि प्रत्येक पाऊल
रायगडच्या उज्ज्वल भविष्यासाठी!

अशा या करारी नेतृत्वाला
या विकासपुरुषाला
या जनमानसातील दीपस्तंभाला
मानाचा मुजरा!

अमृत महोत्सवाच्या अनंत शुभेच्छा साहेब!
आपली ऊर्जा अशीच प्रेरणा देत राहो
आपला आशीर्वाद रायगडला सदैव लाभो!
जय रायगड! जय महाराष्ट्र!!

**-शरद कदम, आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक**

## लाडिवलीत आई गावदेवी उत्सवात ७५ माहेरवाशीणींचा यथोचित सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील लाडीवली गावाचे आराध्य दैवत आणि भक्तांच्या हाकेला धावणारी माऊली, आई गावदेवी (लाडू बाई) हिचा वार्षिक उत्सव संपूर्ण गावात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. सुमारे १८०० सालापासून या जागृत देवस्थानाचा शोध लागल्याची परंपरा असून, आजही तितक्याच श्रद्धेने आणि एकजुटीने हा उत्सव साजरा केला जातो.

आई गावदेवी ही केवळ लाडीवली गावची रक्षक नसून ती नवसाला पावणारी आई म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. गावावर येणारे संकट असो किंवा भक्तांची वैयक्तिक हाक, आई नेहमीच



मदतीला धावून येते, अशी ग्रामस्थांची गाढ श्रद्धा आहे. या उत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे गावकऱ्यांनी एकत्र येऊन केलेला जिर्णोध्दार व प्राणप्रतिष्ठा सोहळा पाहण्यासाठी आणि देवीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

उत्सवाच्या दरम्यान संपूर्ण गाव रोषणाईने सजल्याने जणूकाही दिपावली आल्याचा भास झाला. सर्व जाती-धर्माचे लोक आणि विविध प्रांतातील नागरिक या उत्सवात सहभागी झाले होते, आईचा पालखी सोहळ्यात गावकऱ्यांची मोठी गर्दी झाल्याचे पहावयास मिळाले. यावेळी आई गावदेवीच्या नावाने चांगभलंच्या जयघोषाने लाडीवली परिसर दुमदुमून गेला होता.

सकाळी काकड आरतीनंतर आई लाडूबाई गावदेवी आईच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा झाला झाला. दरम्यान, गावाच्या परंपरेने गावातील ७५ ते ७० वर्षांपासुन माहेरवाशीण यांना बोलवून त्यांचा मानसन्मान करण्यात आला.

## रसायनीत बजरंग दलाच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन

**चौक : प्रतिनिधी**

अखिल आर्यवत संघ आंतरराष्ट्रीय बजरंग दल संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या उपस्थितीत रायगड जिल्हा मध्यवर्ती कार्यालयाचे रसायनी येथे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पत्रकारांशी बोलताना पाटील यांनी सांगितले कि या मध्यवर्ती कार्यालयातून प्रत्येक हिंदूला न्याय देण्यासाठी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे कार्यकर्ते चोवीस तास प्रयत्नशील असणार आहेत. या कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम होणार आहे.

महाराष्ट्र सरकारने गोमातेला राजमाता दर्जा देऊन ही महाराष्ट्र मध्ये गोवंश हत्या का होत आहेत. राज्य माता घोषित करून हिंदूना मुर्ख बनविण्याचे काम होत असल्याचे संस्थापक अध्यक्ष दिनेश पाटील यांनी बोलताना सांगितले.



संघटनेसाठी निष्ठा व तन मन धन लाऊन काम करणारे राकेश खराडे यांना पाटील यांनी आंतरराष्ट्रीय बजरंग दल कोकण प्रांत अध्यक्ष (प्रसिध्दी प्रमुख) म्हणून नियुक्त करण्यात आले व जनार्दन मालुसरे यांना रायगड जिल्हा मंत्री म्हणून घोषित करण्यात आली. कार्यक्रमास उपस्थित रायगड जिल्हा अध्यक्ष नामदेव भोईर, जिल्हा ठाणे मंत्री विशाल जैस्वाल, गोरक्षा जिल्हाध्यक्ष मलेश गुडसे तसेच खालापूर रसायनी परिसरातील आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिघी-पुणे प्रस्तावित मार्गाची प्रतीक्षा

**माणगाव : प्रतिनिधी**

दिघी बंदर आता केवळ स्थानिक विकासाचा विषय राहिलेला नाही, तर तो संपूर्ण कोकण-पश्चिम महाराष्ट्राच्या आर्थिक भविष्याशी जोडला गेला आहे. बंदराचे काम वेगाने सुरू असताना ते विस्तारित व्यापारी आणि लॉजिस्टिक हबमध्ये रूपांतरित होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, परंतु या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या यशासाठी सर्वात मोठी गरज आहे ती सक्षम आणि कमी अंतराची रस्ते जोडणी आहे.



सध्या दिघीहून पुण्याकडे जाण्यासाठी ताम्हिणी घाट हा प्रमुख मार्ग आहे, मात्र हा मार्ग लांब, वळणावळणाचा आणि पावसाळ्यात धोकादायक ठरतो. अंतर सुमारे ३० ते ५० किलोमीटरने अधिक पडते. त्यामुळे वेळ, इंधन आणि खर्च या तिन्ही बाबींमध्ये वाढ होते. परिणामी व्यापारी, ट्रान्सपोर्टर आणि स्थानिक नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसतो. ताम्हिणी घाटाला पर्याय म्हणून दोन महत्त्वाचे मार्ग सुचवले गेले आहेत. या मार्गांमुळे दिघी-पुणे अंतर लक्षणीयरीत्या कमी होऊन मालवाहतूक सुलभ होईल, असा दावा आहे.

पहिला प्रस्तावित मार्ग माणगाव-कुंभे-निजामपूरमार्गे पुण्याला जोडणारा आहे. या मार्गातील काही भाग रायगड जिल्ह्यात तर काही पुणे जिल्ह्यात येतो. त्यामुळे दोन्ही जिल्ह्यांच्या प्रशासनात समन्वयाचा अभाव जाणवतो. दुसरा मार्ग माणगाव-कुंभे-कुंभेची वाडी-वेल्हे-पानशेत-पुणे असा आहे. या मार्गात डोंगराळ भागातून रस्ता काढण्याचे आव्हान आहे. काही ठिकाणी प्राथमिक कामे झाली असली तरी संपूर्ण मार्ग अद्याप अपूर्ण आहे. याबाबत स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी कुंभे ते वेल्हे मार्ग करण्याचे आश्वासन दिले होते. त्यांच्यानंतर हा महामार्ग पुर्ण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या मते, रस्ता पूर्ण झाला तर दिघी-पुणे अंतर जवळपास ५० किलोमीटरने कमी होईल. यामुळे वेळेची बचत तर होईलच, पण वाहतूक खर्चही मोठ्या प्रमाणावर कमी होईल. विकासाच्या आश्वासनांमध्ये अडकलेला मार्ग दिघी बंदरामुळे दक्षिण रायगड, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगांना चालना मिळणार आहे. निर्यात-आयात सुलभ होईल, रोजगारनिर्मिती वाढेल आणि पर्यटनालाही चालना मिळेल.

### कोकण, पुणे विकासाचा दुवा

स्थानिक नागरिक, व्यापारी संघटना आणि वाहन चालकांकडून पर्यायी मार्गाच्या कामाला गती देण्याची जोरदार मागणी होत आहे. हा रस्ता केवळ अंतर कमी करणारा नाही, तर कोकण-पुणे विकासाचा जीवनदायी दुवा ठरू शकतो, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. राज्य सरकारने आणि संबंधित विभागांनी या प्रकल्पाकडे तातडीने लक्ष देऊन निधी आणि प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया जलद करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

विशेषतः कोकणातील पर्यटन स्थळांना पुणे व उत्तर महाराष्ट्रातील पर्यटकांसाठी सुलभ प्रवेश मिळू शकतो.

सध्याच्या ताम्हिणी घाटात वाढती वाहतूक, वारंवार लागणाऱ्या वाहनांच्या रांगा आणि पावसाळ्यातील भूस्खलन यामुळे अडचणी निर्माण होतात. भविष्यात दिघी बंदर पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यास या घाटावरील ताण अधिकच वाढणार आहे.

# चौल-आग्राव रस्ता नूतनीकरण संथगतीने

## विद्यार्थी, ग्रामस्थ, प्रवासीवर्गाचे बेहाल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल आग्राव रस्ता नुतनीकरणास प्रारंभ झाला, काही ठिकाणी क्रॉंकिटीकरण सुध्दा झाले, मात्र या कामासाठी अनेक ठिकाणी रस्ता खोदाई सुध्दा करण्यात आली आहे. हे काम अत्यंत संथ गतीने होत असून चौल-आग्राव पंचक्रोशीतील विद्यार्थी, ग्रामस्थ व प्रवासीवर्ग यांचे बेहाल होत आहे. एकूणच दोन वर्षापुर्वी मंजूर निधीचे काम ठेकेदार वेळेत काम पुर्ण न करता मनमानी करत असल्याची संप्तत प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

चौल-आग्राव रस्ताला निधी मंजूर होवून दोन वर्ष उलटले, गेल्या वर्षी जानेवारी मध्ये काम सुरू करण्याची ठेकेदाराला निविदा प्राप्त झाली होती, परंतू तेव्हाही काम सुरू करण्यात आले नाही, पर्यायी रस्ता नसल्याने ऐन पावसाळयात सुध्दा काम पुर्ण करता आले नाही, दिवाळी पुर्वी सुरू झालेले चौल-आग्राव नुतन क्रॉकिटीकरणाचा रस्ता सहा महिने उलटून गेले तरी अदयापी पुर्तता केली जात नाही. संबधीत ठेकेदार या कामात दिरंगाई करत असल्याचा आरोप सर्व थरातून होत आहे.

चौल-आग्राव रस्ता नुतनीकरणाने आग्राव-अलिबाग एस.टी. बसेस बंद असल्याने विदयार्थीवर्गाचे खुप हाल होत आहेत, तसेच ग्रामस्थ व प्रवासीवर्ग यांचेही बेहाल झाले आहे. रस्ताचे कामाची पुर्तता न झाल्याने ठिकठिकाणी ठेकेदारानी मटेरीयल रस्तात टाकले असल्याचे तेथे दोन चाकी, तिन चाकी वाहनाच्या अपघातास निमत्रंण ठरत आहे.

एकूणच ठेकेदाराच्या मनमानीने चौल-आग्राव रस्ता नुतनीकरण संथ गतीने होत असून संबधीत खात्याने लक्ष्य देवून सदर ठेकेदारास कामाच्या पुर्ततेचा कालावधी जाहीर करावा, अन्यथा या ठेकेदारास काळ्यया यादीत टाकून हे काम काढून घेण्यात यावे, अशी मागणी पंचक्रोशीतून सर्व थरातून केली जात आहे.

# चित्रकला स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

शिवशंभो युवा हायकर्स कर्जत व कै. श्रीधर राजाराम भुर्के कलामंच आयोजित शिवरंग २०२६ चित्रकला स्पर्धेत २२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. येथील रॉयल गार्डनच्या सभागृहात शिवरंग २०२६ चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. छोटा गट पाचवी ते सातवी व मोठा गट आठवी नववीच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता.

चित्रकला स्पर्धेचे उद्घाटन शिवशंभो युवा हायकर्स कर्जत संस्थेचे अध्यक्ष विकास चित्ते यांच्या हस्ते करण्यात आले होते. यावेळी भुर्के कला मंचाचे भालचंद्र भुर्के, रॉयल गार्डनचे संचालक निलेश चौडीये, विशाल सुरावकर, प्रदीप बागल साहेब, प्रदीप भुर्के आदी उपस्थित होते.

स्पर्धेत सहभागी झालेली विद्यार्थी चित्र काढण्यात एकदम तल्लीन झाले होते. त्यांचे चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. आपल्या मुलांचे कौतुक करण्यासाठी, स्पर्धा पाहण्यासाठी पालक मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी पालकांशी संवाद साधण्यात आला. विकास चित्ते यांनी संस्थेच्या विविध उपक्रमाची माहिती दिली. उपनगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक राजाभाऊ कोठारी, मुकुंद मोधळे, प्रशांत उगले, अभिनव ज्ञान मंदिर शाळेचे मुख्याध्यापक विलास शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड, गडप्रेमी नितीन पाटील, अपर्णा चव्हाण, दिनेश कडू आदी उपस्थित होते.

सुदर्शन खांबल यांच्या ओघवत्या वाणीने मुलांना व उपस्थित पालक वर्गास मंत्रमुग्ध केले. खुशी नितीन पाटील या दहा वर्षाच्या चिमुरडीने आतापर्यंत १०८ किल्ले भटकंती पुर्ण केल्याने सन्मानपत्र देऊन तिचा विशेष सत्कार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय किर्तीचे चित्रकार पराग बोरसे, हरि फुलवरे यांनी मोठ्या गटासाठी व प्रदिप घाडगे, मानसी सुळे यांनी लहान गटासाठी परिक्षक म्हणून परिक्षण केले. सुत्रसंचालन गौरव चित्ते व मंजिरी कर्वे यांनी केले तर आभार विशाल सुरावकर यांनी मानले.



# बोरघाटाजवळ पुन्हा गॅस टँकरचे ब्रेक फेल

## सुरक्षा यंत्रणांच्या तत्परतेने अनर्थ टळला; वाहतूक काही काळ बंद

**चौक, खालापूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या हद्दीत सोमवारी (दि.२३) सकाळी एक संभाव्य भीषण दुर्घटना थोडक्यात टळली. कोचीहून गुजरातकडे २१ टन क्षमतेचा प्रोपिलीन गॅस वाहून नेणारा टँकर (एनएल ०१ एएफ ५०४०) बोरघाट परिसरात येत असताना चालकाच्या लक्षात आले की वाहनाचे ब्रेक निकामी झाले आहेत. समोर तीव्र उतार आणि धोकादायक वळणे असल्याने मोठा अनर्थ ओढवण्याची शक्यता होती, मात्र चालकाने प्रसंगावधान राखत रस्त्याच्या कडेला असलेल्या आरसीसी रिटेनिंग वॉलला जाणीवपूर्वक धडक देत टँकर नियंत्रित केला. त्यामुळे टँकर जागीच थांबला आणि मोठी दुर्घटना टळली.



घटनेची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक पोलीस बोरघाट, आय.आर.बी.ची पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणेची फायर ब्रिगेड, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बलचे जवान तसेच हेल्प फाउंडेशन ची टीम आणि पेट्रोलिंग वाहनांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला. सुरक्षेच्या कारणास्तव मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळ पूर्णतः बंद ठेवण्यात आली होती.

हेल्प फाउंडेशनचे केमिकल एक्सपर्ट धनंजय गीध यांनी टँकरची तांत्रिक स्थिती, दाब, गळतीचा धोका आदी बाबींची तपासणी करून सुरक्षिततेची जबाबदारी सांभाळली. क्रेन आणि पुलरच्या सहाय्याने टँकर अपघातस्थळापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावरील मोकळ्या जागेत हलविण्यात आला. खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे आणि महामार्ग वाहतूक पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली. आरटीओ अधिकारी रावते यांनी वाहनाची तांत्रिक तपासणी केली. खोपोली पोलीस स्टेशन मध्ये या अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

टँकर ओढणारे वाहन पूर्णतः निकामी झाले असून, दुसऱ्या वाहनाच्या साहाय्याने टँकर गुजरातकडे रवाना करण्यात येणार आहे. अलिकडच्या काही दिवसांत प्रोपिलीन गॅस वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या सलग दुर्घटना चिंतेचा विषय ठरत आहेत. उतारावर ब्रेक फेल झाल्यानंतर वाहन अनियंत्रित झाले असते, तर मोठ्या प्रमाणावर जीवितहानी आणि पर्यावरणीय नुकसान होऊ शकले असते.

या पार्श्वभूमीवर धोकादायक रसायनांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कडक तपासणी, नियमित फिटनेस चाचण्या आणि संबंधित कंपन्यांनी विशेष सुरक्षा उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

# महेश मोरे यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

**माणगाव : बातमीदार**

नवी दिल्ली येथे झालेल्या दीक्षान्त कार्यक्रमामध्ये माणगाव येथील महेश गोपाळ मोरे यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सीडरब्रुक युनिव्हर्सिटी यांनी गोल्ड मेडल देऊन डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D) ही पदवी प्रदान करण्यात आली.



महेश मोरे हे गेली अनेक वर्षे रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करीत आहेत. त्यांना यापूर्वी रायगड भूषण पुरस्कार, (पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते) व माणगाव तालुका आदिवासी समाजाच्या वतीने आदिवासी मित्र पुरस्कार देण्यात आला तसेच माजी रायगड जिल्हाधिकारी डॉ.महेद्र कल्याणकर यांच्या हस्ते जनजाती गौरव सन्मान देऊन गौरविण्यात आले होते. या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. सोशल वर्कर म्हणून मला गोल्ड मेडल देऊन डॉक्टरेट पदवी मिळाली याबद्दल युनिव्हर्सिटीचे महेश मोरे यांनी आभार मानले.

# माझी वसुंधरा अभियानात चौक ग्रामपंचायत कोकण विभागात प्रथम

**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियानात ग्रुप ग्रामपंचायत चौक यांनी उत्कृष्ठ कामगिरी केल्याने कोकण विभागात त्यांचा प्रथम क्रमांक तर राज्यात चौथा क्रमांक आल्याने गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत चौक सरपंच रितू ठोंबरे व ग्राम पंचायत अधिकारी गणेश मोरे यांनी माझी वसुंधरा अभियान ५.० हा कोकण विभाग स्तरीय प्रथम क्रमांक पुरस्कार पटकावल्याने त्यांचे विशेष अभिनंदन होत आहे. रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी त्यांचे विशेष कौतुक केले आहे. कोकणात प्रथम तर राज्यात चौथा क्रमांक मिळाला आहे.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंच तत्वांवर आधारित स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेतर्गत पाच हजार ते १० हजार हजार लोकसंख्या गटात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या गावांमध्ये चौक ग्रामपंचायतीचा विभागात प्रथम क्रमांक आला. प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याने पन्नास लाख रुपयांचे पारितोषिक जिंकले.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व जतन करण्यासाठी ग्रामपंचायत चौक यांनी केलेल्या या कामगिरीबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि माझी वसुंधरा अभियान संचालनालय यांचे वतीने देण्यात आला. सरपंच रितू ठोंबरे व ग्रामपंचायत अधिकारी गणेश मोरे यांनी हा पुरस्कार ग्राम पंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शिक्षक वृंद, ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच, पंचायत समिती स्तरावरील गट विकास अधिकारी, सहा. गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, पाणी व स्वच्छता विभाग, सर्व ग्रामपंचायतचे क्षेत्रीय अधिकारी यांच्या मेहनतीने व सहकार्याने प्राप्त झाला असून त्यांचे आभार मानले.

# माणगाव येथे सद्गुरू माऊली बेटकर महाराजांची जन्मशताब्दी



**माणगाव : प्रतिनिधी**

श्री गोरक्षनाथ मंदिर नवनाथ सत्संग मंडळ माणगाव यांच्यातर्फे रायगड भूषण व समाज भूषण पुरस्कार प्राप्त महान तपोनिधी चैतन्य ब्रम्हलीन प.पु. सद्गुरू माऊली बेटकर महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व रायगड भूषण प.पु. गुरुवर्य दादा महाराज शिंदे व रायगड भूषण प.पु. गुरुवर्य यशवंत महाराज गायकवाड तसेच ज्येष्ठ गुरुबंधू राजगड भूषण श्री शांताराम बाळू खाडे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सद्गुरू माऊली बेटकर महाराज यांचा जन्मशताब्दी महोत्सव सोमवारी (दि.२३) श्री गोरक्षनाथ मंदिर ढालघर फाटा - माणगाव येथे अत्यंत भक्तिमयपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

मंडळाच्या या उत्सवात या दिवशी सकाळी देवदेवतांची पूजा, यज्ञविधी, तीर्थ प्रसाद, उपाध्याय सुभाष म्हस्के, सकाळी ८ ते १२ यावेळेत शोभायात्रा - ब्रम्हलीन सद्गुरू माऊली बेटकर महाराज यांच्या प्रतिमेची मिरवणूक दिंडी सोहळा श्री बालाजी मंदिर माणगाव ते श्री गोरक्षनाथ मंदिर ढालघर फाटा-माणगाव अशी काढण्यात आली. दुपारी १२ : ३० ते १ : ३० जेष्ठ गुरुबंद वामन म्हस्के यांचे गीतेवर आधारित प्रवचन, दुपारी १ :३० ते ३:३० यावेळेत भालचंद्र खाडे, सुरेखा शिर्के, श्वेता खडतर, शैला खडतर, गीता पवार यांच्यातर्फे देण्यात आलेला महाप्रसाद असे कार्यक्रम घेण्यात आले.

हा जन्मशताब्दी महोत्सव साजरा करण्यासाठी संपूर्ण नवनाथ सांप्रदाय मंडळाचे अध्यक्ष सुरेश गायकवाड, विश्वस्त कमिटीचे अध्यक्ष शांताराम खाडे, उपाध्यक्ष वामन म्हस्के, सचिव भास्कर म्हस्के, सहसचिव शांताराम शिंदे,खजिनदार अनंत कडू, सदस्य शिवाजी सत्वे, नथुराम पालकर, महादेव मोरे, पांडुरंग मारणे, हरेश खडतर, सदाशिव जुमारे, बाबू खाडे, सुभाष खाडे, हितचिंतक खेमचंद मेथा, निलेश लिलाचंद शेट, मंगेश मेथा, व्यवस्थापक सर्व शाखांचे विश्वस्त मंडळ, सदस्य व शिष्यगण, भक्तगण तसेच विंचवली ग्रामस्थ मंडळ आदी उपस्थित होते.

# चौल जान्हवी तळे येथे रस्ता कामाचे भूमिपूजन



**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल जान्हवी तळे येथे नुतन रस्ताचे भूमिपूजन कार्यक्रम नुकताच झाला.

यावेळी नवनिर्वाचीत जि.प.सदस्य डॉ. सचिन राउळ, पंचायत समिती सदस्या अंकिता अंकुश घरत,तसेच चौलचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रविण राउत, सुदेश राउळ, प्रशांत शेणवईकर, स्वप्निल शेवणईकर, अलिबाग-मुरूड मतदार संघ महिला संघटिका तनुजा मोरे-घरत, रणजीत धरणकर तसेच जान्हवी तळे ग्रामस्थ रमेश भोईर, रोहित पालवणकर, रमाकांत पाटील, मनिष भोईर, सचिन मोहिते, प्रकाश शेवणईकर आदीची उपस्थिती होती.


चौलमध्ये चौल शिवसेनेच्या मागणीने व आमदार महेंद्र दळवी यांचे प्रयत्नाने तसेच जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राउळ यांच्या पाठपुराव्याने एमएमआरडीअे माध्यमातून चौलमधील अनेक रस्ता नुतनीकरणासाठी १९ कोटी २७ लाख रूपये निधी उपलब्ध करण्यात आला आहे. या निधीतून चौल जान्हवी तळे रस्ता नुतनीकरण करण्यात येत आहे.

# खालापुरात श्री वडोबा मंदिराचा जीर्णोद्धार

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर येथील पोलीस ठाणे, तहसील कार्यालय यांच्या आवारातील श्री वडोबा देवस्थान, श्री दत्त, श्री विठ्ठल रखुमाई मंदिराचा जीर्णोद्धार प्राणप्रतिष्ठा सोहळा खालापूर ग्रामस्थ व खालापुर पोलीस यांच्या सहकार्याने उत्साहात झाला.

श्री बडोबा देवस्थान हे खूप जुने मंदिर असून ऐतिहासिक असावे असे ग्रामस्थ सांगत आहेत. श्री बडोबा देवस्थान पाषाणरुपी आहे. पूर्वी खालापूर तालुक्यात बंदोबस्तसाठी आलेले पोलीस याठिकाणी थांबायचे, तहसील कार्यालय, पोलीस ठाण्यात, भूमी अभिलेख कार्यालयात किंवा येथील तलाठी कार्यालयात आलेले नागरिक थांबत असत. मंदिर असे जीर्ण झाल्याने ग्रामस्थ यांनी खालापूर पोलिसांच्या सहकार्य घेऊन मंदिर जीर्णोद्धार करण्याचा प्रारंभ केला, तत्कालीन पोलीस यांचे व आजचे पोलीस यांचे हे श्रद्धास्थान आहे. यात नव्याने विठ्ठल रुक्मिणी व दत्त मूर्तीचे यांची नव्याने प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.



या सोहळ्यानिमित्त मंदिराच्या प्रांगणात दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम झाले. ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून खालापूर पोलिसांच्या सहकार्यातून येथील श्री वडोबा मंदिराचा कायापालट करण्यात आला. मंदिराच्या कलशावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

# कोल्हापूरचा अजिंक्य रेडकर 'नवी मुंबई महापौर श्री'

## नेरूळचा निरंत पाटील नमुंमपा क्षेत्र श्री किताबाचा मानकरी

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यभरातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या विविध वजनी गटाच्या १२८ शरीरसौष्ठवपटूंमधून कोल्हापूरच्या अजिंक्य रेडकर याने सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करीत दीड लाख बक्षीस रकमेसह नवी मुंबई महापौर श्री राज्यस्तरीय शरीरसौष्ठवपटू किताबासह मानाचा नवी मुंबई महापौर श्री चषक पटकाविला. सोलापूरच्या पंचाक्षरी लोणारने ५० हजार पारितोषिक रकमेसह राज्यस्तरीय उपविजेतेपद पटकाविले.

नवी मुंबई महापालिकास्तरीय स्पर्धेत सहभागी ७१ स्पर्धकांमधून सर्वोत्कृष्ट शरीरसौष्ठवपटूचे नमुंमपा क्षेत्र श्री विजेतेपद ७० हजार पारितोषिक रक्कम व मानाच्या चषकासह नेरूळच्या निरंत पाटील यांनी पटकाविले. नेरूळच्या अक्षय पाटीलने उपविजेतेपद ३८



हजार रक्कमेसह संपादन केले.

राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेत मोहम्मद जमाल ठाणे याने मोस्ट इम्प्रुव्हड बॉडी बिल्डर किताब, तर स्वप्नील सकपाळ रायगड याने बेस्ट पोझर किताब प्राप्त केला. या दोघांनाही प्रत्येकी १५ हजार रकमेची पारितोषिके प्रशस्तीपत्रासह प्रदान करण्यात आली.

नवी मुंबई महापौर श्री राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा आणि नमुंमपा क्षेत्र श्री शरीरसौष्ठव स्पर्धा वाशी येथील विष्णूदास भावे नाट्यगृहात उत्साहात झाली. या स्पर्धेचा शुभारंभ महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते झाला. त्यांच्याच हस्ते नवी मुंबई महापालिका क्षेत्र श्री पुरस्कार वितरण करण्यात आले.

समारोपप्रसंगी राज्यस्तरीय महापौर श्री शरीरसौष्ठव स्पर्धेचे पारितोषिक वितरण करताना उपमहापौर दशरथ भगत यांनी आगामी काळात राष्ट्रीय स्तरावरील शरीरसौष्ठव स्पर्धा आयोजनाचा मनोदय असल्याचे सांगितले.

शरीरसौष्ठव संघटनेचे पदाधिकारी तथा माजी खासदार संजीव नाईक यांनी सन १९९६पासून सातत्याने यशस्वीपणे आयोजित केल्या जात असलेल्या या स्पर्धेचे आकर्षण संपूर्ण राज्यातील शरीरसौष्ठवपटूंना असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

### प्रत्येक वजनी गटातील विजेत्यांना पारितोषिके

नवी मुंबई महापौर श्री राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा ५५, ६०, ६५, ७०, ७५, ८०, ८५ किलोपर्यंत व ८५ किलोवरील अशा आठ वजनी गटांमध्ये आयोजित करण्यात आली होती. त्याचप्रमाणे नवी मुंबई महापालिका क्षेत्र श्री शरीरसौष्ठव स्पर्धा ५०, ५५, ६०, ६५, ७० किलोपर्यंत व ७० किलोवरील अशा सहा वजनी गटांमध्ये घेण्यात आली. या प्रत्येक वजनी गटातील अनुक्रमे सहा व पाच विजेत्यांना रोख पारितोषिकांसह प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली.



# महाराष्ट्र राज्याचा कबड्डी संघ राष्ट्रीय स्पर्धेकरिता बडोदा येथे रवाना

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाच्या सराव शिबिराचे नुकतेच अलिबाग तालुक्यातील आवास येथे आयोजन करण्यात आले होते. सराव पूर्ण झाल्यानंतर हा संघ येथील नागेश्वर मंदिरात दर्शन घेऊन राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी बडोदा येथे रवाना झाला.

या संघात कर्णधार संकेत सावंतसह अस्लम इनामदार, अजित चौहान, अदित्य शिंदे, शिवम पटार, सौरभ राऊत, सौरभ फगारे, दादासो पुजारी, सुरेश जाधव, साईप्रसाद पाटील, अल्केश चव्हाण, अनुज गावंड, जयेश महाजन, आदित्य पोवार या खेळाडूंचा समावेश होता. प्रशिक्षक रमेश भेंडीगिरी व व्यवस्थापक अक्षय जाधव यांनी सर्व खेळाडूंना मार्गदर्शन केले.

सराव शिबिर सांगता समारंभासाठी सामाजिक कार्यकर्ते रणजीत राणे, सरपंच अभिलाषा राणे, माजी सरपंच अभिजीत राणे, उपसरपंच, सदस्य, स्पर्धा व्यवस्थापक गणेश राणे, दिलखुश क्रीडा मंडळाचे अध्यक्ष सुधीर राऊळ, संदेश वर्तक, अमित पाटील, गावातील क्रीडा मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.









उलवे नोड : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रौढ महिला व पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत १२८ पुरुष, तर ३२ महिला संघांनी सहभाग घेतला. विजेत्या संघांना रविवारी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com